POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३२७ ● मुंबई, सोमवार, २९ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मुंबईसह 'या' जिल्ह्यांत पाऊस धुमाकूळ घालणार

राज्यभरात मान्सूनने हजेरी लावली असून पावसासाठी पोषक असं हवामान कायम राहण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांत राज्यातील अनेक भागांत पावसाची संतत धारा सुरु असून 27 जून रोजी अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने दमदार हजेरी लावली होती. अशातच 28 जून 2026 रोजी राज्यातील एकूण हवामान विभागाचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे.

- **कोकण :** कोकण विभागातील पालघर, ठाणे आणि मुंबई परिसरात विजांच्या कडकटासह पाऊस धिंगाणा घालणार आहे. तसेच वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली.
- **पश्चिम महाराष्ट्र :** पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह मान्सूनचा अलर्ट जारी करण्यात आला. तसेच काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवलेली आहे. सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह पावसाची अधिकची शक्यता वर्तवली आहे.
- **मराठवाडा :** मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्टचा अंदाज जारी केला. याच भागांत विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम मान्सून दाखल होणार आहे. हिंगोली जिल्ह्यांत काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज वर्तवला आहे.
- **उत्तर महाराष्ट्र :** उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.
- **विदर्भ :** विदर्भातील बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, अमरावती, भंडारा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या सर्व जिल्ह्यांना यलो अलर्टचा अंदाज वर्तवण्यात आला.

महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांना यलो अलर्ट

लवकरच विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाच्या सरी बरसणार

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,**

वाढत्या उष्णते मध्ये दिलासादायक गोष्ट समोर आली आहे. 28 जून रोजीही राज्यातील 27 जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

मन्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्यानंतर राज्यात पावसासाठी पोषक वातावरण कायम आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत पावसाची संततधार सुरू असून 27 जून रोजीही अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. दरम्यान, 28 जून रोजीही राज्यातील 27 जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

कोकण विभागातील पालघर, ठाणे आणि मुंबई परिसरात विजांच्या कडकडाटासह तसेच वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. या चारही ठिकाणी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात 30 ते 40 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही वादळी



वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

पुणे, सातारा, कोल्हापूर आणि घाटमाथा परिसरात विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. या भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून 40 ते 50 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात. सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता कायम आहे.मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. हिंगोली जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

नाशिक घाटमाथा आणि अहिल्यानगर जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज असल्याने या भागांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह 40 ते 50 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.राज्यात पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील भीषण वास्तव...

50 शाळा शिक्षकांविना, 800 शिक्षकांची कमतरता, विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह



शिक्षकच उपलब्ध नाहीत

जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये वर्गखोल्या, इमारती आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती असली तरी शिकवण्यासाठी शिक्षकच उपलब्ध नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरत असून, पालकांमध्येही संतापाचे वातावरण आहे. शिक्षणाचा अधिकार हा केवळ कागदावरच राहिला आहे का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

■ **भंडारा। प्रतिनिधी,**

भंडारा जिल्ह्यातल्या शिक्षण व्यवस्थेचं विदारक वास्तव समोर आलंय. एका बाजूला सरकार "गुणवत्तापूर्ण शिक्षण" आणि "डिजिटल इंडिया"च्या घोषणा करतंय तर दुसऱ्या बाजूला जिल्ह्यात तब्बल 50 शाळांमध्ये एकही शिक्षक नाही. शिक्षकांशिवाय शाळा, रिकामे वर्ग आणि शिक्षणापासून वंचित राहणारी ग्रामीण भागातली मुलं यात नेमका विद्यार्थ्यांचा गुन्हा काय? पाहूया हा विशेष रिपोर्ट...

भंडारा जिल्ह्यातील ५० शाळा शिक्षकांविना सुरू

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झालंय.. विद्यार्थ्यांच्या हातात नवी पुस्तकं आलीत. पण अनेक गावांमधल्या शाळांमध्ये शिकवण्यासाठी शिक्षकच नाहीत. भंडारा जिल्ह्यातल्या तब्बल 50 जिल्हा परिषदांच्या शाळा शिक्षकांविना सुरू होणार असल्याची धक्कादायक माहिती समोर आलीय. शाळांमधल्या वर्गखोल्या सजल्यात, विद्यार्थीही सज्ज आहेत.. मात्र गुरुजींचा पत्ता नाहीय. त्यामुळे शिक्षणाचा संपूर्ण डोलारा कोलमडण्याची वेळ आलीय. ग्रामीण आणि आदिवासी भागातल्या विद्यार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान होण्याची भीती आहे. प्रशासन मात्र हातावर हात धरून बसल्याचा आरोप होतोय. शिक्षणाच्या नावावर मोठमोठ्या घोषणा करणा-या सरकारला या 50 शाळा दिसत नाहीत का? असा संतप्त सवाल आता पालक विचारत आहेत.

गरिबांच्या मुलांना वाली कोण?

दुसरीकडे, भली मोठी डोनेशन देऊन खासगी शाळांमध्ये लोकं रांगा लावत आहेत. या शाळांमध्ये ॲडमिशनसाठी मुलांसोबत पालकांचीही परीक्षा होते. आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी प्रत्येक पालक झटत असतो. पण ज्यांची परिस्थिती हालाखीची आहे. त्यांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. अशा नागरिकांच्या पाल्यांना ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळांचा आसरा असतो. परंतु, त्या ठिकाणीही पाल्याला पाठवून सुद्धा शिक्षकच नसेल तर या गरिबींच्या लेकरांनी करायचे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

भंडारा जिल्ह्यातल ८०० शिक्षकांची कमतरता

भंडारा जिल्ह्यात एकूण 794 जिल्हा परिषद शाळा आहेत. मात्र या शाळांमध्ये तब्बल 800 शिक्षकांची कमतरता आहे. अनेक शिक्षक निवृत्त झालेत, पण त्यांच्या जागा अद्याप भरल्या गेल्या नाहीत. परिणामी काही शाळांमध्ये एकाच शिक्षकावर अनेक वर्गाची जबाबदारी आहे, तर 50 शाळा पूर्णपणे शिक्षकांविना आहेत. ही परिस्थिती कायम राहिली तर अनेक शाळा बंद करण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा स्वतः जिल्हा परिषद शिक्षण सभापतींनी दिलाय. शिक्षक भरतीसाठी उपोषणही केलं, मात्र सरकारनं दखल घेतली नाही.

हजारो विद्यार्थ्यांचं भविष्य धोक्यात

एकीकडे शिक्षणाला प्राधान्य देण्याचे दावे केले जात आहेत, तर दुसरीकडे भंडारा जिल्ह्यातल्या 50 शाळा शिक्षकांविना सुरू होणार आहेत. 800 शिक्षकांची कमतरता आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे हजारो विद्यार्थ्यांचं भविष्य धोक्यात आलंय. आता सरकार यावर काय निर्णय घेतं, याकडे संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागलंय... पालक आणि ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली

या गंभीर परिस्थितीबाबत पालक आणि ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तातडीने शिक्षकांची भरती करून रिक्त पदे भरण्याची मागणी त्यांनी केली आहे. शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अद्याप कोणताही ठोस निर्णय नाही

दरम्यान, जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती नरेश ईश्वरकर यांनीही या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले आहे. शिक्षक भरतीसाठी आंदोलन आणि उपोषण करण्यात आले, मात्र अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप त्यांनी केला. हीच परिस्थिती कायम राहिल्यास भविष्यात अनेक शाळा बंद करण्याची वेळ येऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

एकीकडे शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे सांगितले जात असताना दुसरीकडे शिक्षकांच्या कमतरतेमुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच निर्माण झालेल्या या गंभीर समस्येवर सरकार तातडीने काय निर्णय घेते, याकडे भंडारा जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

मुंबईत पुन्हा रक्तरंजित थरार... चाललंय काय?

माहिम रेल्वे स्थानकाबाहेर तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

मुंबईत पुन्हा रक्तरंजित थरार घडला आहे. मुंबईत लोकल ट्रेनमध्ये २२ वर्षीय तरुणाची हत्या झाल्याची घटना ताजी असताना आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माहिम स्टेशनबाहेर किरकोळ धक्काबुक्कीच्या वादातून ३५ वर्षीय व्यक्तीवर अज्ञात हल्लेखाराने धारदार शस्त्राने सपासप वार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने मुंबईतील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाला सायन रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्याच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवीन प्रसन्ना असे हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. नवीन हा माहिम पश्चिम भागात असलेल्या पितांबर लेन भागात राहायला आहे. नवीन हा गुरुवारी रात्री साडेदहाच्या सुमारास लोअर परळ येथील ऑफिसमधून काम आटोपून घरी परतत होता. त्याचवेळी अज्ञात हल्लेखोराने नवीनवर जीवघेणा हल्ला केला.

नेमकं काय घडलं?

माहिम स्टेशनबाहेर जात असताना नवीनचा अज्ञात



सॉरी म्हटल्यानंतरही चाकू हल्ला

माहिम रेल्वे स्टेशन परिसरात चालताना धक्का लागल्यानंतर नवीनने सॉरी म्हटल्यनंतरही आरोपीने नवीनवर चाकू हल्ला केला. धक्का लागल्याने मोबाइल खाली पडल्याचा कांगावा करत आरोपीने हल्ला केला. अज्ञात हल्लेखोराने तरुणावर चाकूने वार केल्याने नवीन रक्तबंबाळ झाला. त्यामुळे त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. खासगी कंपनीत ऑफिस बॉय म्हणून काम करणाऱ्या नवीनवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. २५ जून रोजी घडलेल्या घटनेचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

व्यक्तीला धक्का लागला. त्यानंतर अज्ञात हल्लेखोराने मोबाइल खाली पडून तुटल्याचा दावा केला. त्यानंतर त्याने नवीनकडे नुकसानभरपाईची मागणी केली. परंतु नवीनने पैसे देण्यास नकार दिला. याच रागातून हल्लेखोराने नवीनवर चाकू काढून वार केले. त्यानंतर घटनास्थळावरून फरार झाला.

आरोपीच्या हल्ल्यात नवीनच्या पोटावर गंभीर जखमा झाल्या आहेत. या हल्ल्यात नवीन रस्त्यावर कोसळला. आरोपीच्या हल्ल्यात जखमी झालेल्या नवीनला तातडीने सायन रुग्णालयात दाखल करण्यात आलं. नवीनचे भाऊ सचिन यांनी सांगितलं की, नवीन हा लोअर परळ भागातील जाहिरात, मनोरंजन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीत कार्यालयीन कर्मचारी म्हणून काम कार्यरत आहे. जीवघेण्या हल्ल्यानंतर नवीन जवळपास 15 तास बेशुद्ध होता.

पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात हल्लेखोराच्या विरोधात हत्येचा प्रयत्न, जीवे मारण्याची धमकी, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल केलाय. हल्ला केल्यानंतर आरोपी रेल्वे मागार्ने घटनास्थळावरून फरार झाल्याचे संशय व्यक्त करण्यात आलाय. आरोपी हा अंमली पदार्थांचा व्यसनाधीन असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर सर्वसामान्य मुंबईकरांच्या चिंता पुन्हा वाढली आहे.

सीएसएमटी स्टेशनबाहेर लोकांवर उगारला धारदार कोयता

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत लोकल ट्रेनमधील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काही दिवसांपूर्वी चर्चगेट -विरार लोकल ट्रेनमध्ये २२ वर्षीय तरुणाची चाकूने वार करून हत्या झाल्याची घटना घडली होती. तर माहिममध्येही स्टेशनबाहेर एकावर चाकू हल्ल्या झाल्याची घडली आहे. त्यानंतर आता नेहमी वर्दळ असलेल्या सीएसएमटी रेल्वे स्टेशन एकाने लोकांवर धारदार कोयता उगारल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रकरणानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं. या संपूर्ण घटनेनंतर मुंबई पोलीस अलर्ट मोडवर पोहोचले आहेत.

मुंबई पोलिसांनी घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक संध्या निकम या त्यांच्या पथकासह तात्काळ घटनास्थळी पोहोचल्या. त्यावेळी आरोपी हातात कोयता घेऊन मोठ्याने ओरडत होता. तसेच येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडे धावत होता. जणू हा आरोपी त्याच्यासोबत असलेल्या महिलेवर हल्ला करणार होता.

पोलिस पथकाने आरोपी तरुणाला मागून घेरले. त्यानंतर त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी मोठ्या हुशारीने त्याच्या हातातून कोयता हिसकावून घेतला. चौकशीदरम्यान, महिलेने खुलासा केला की आरोपी वकार अन्वर शेख (२२) हा तिचा पती आहे. ते फिरायला आले होते. दोघांमध्ये वाद झाल्यानंतर वकारने त्याच्या बॅगेतून कोयता काढून महिलेला आणि आजूबाजूच्या इतरांना धमक्या देण्यास सुरुवात केली.

तत्पूर्वी, पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ कारवाई करत महिलेची सुखरूप सुटका केली. तसेच आरोपीला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेले. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. अटक केलेल्या आरोपींविरुद्ध अनेक गुन्हे दाखल करण्यात आलेत. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

विषारी कॅप्सूल वाटप प्रकरणात सायको किलरचा मास्टरप्लॅन



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील मोहरम मिरवणुकीदरम्यान विषारी कॅप्सूल वाटप करण्याच्या संशयित कटाचा मुंबई पोलिसांनी पदार्फाश केला आहे. या प्रकरणात फैयाज निसार हुसेन प्रेमजी नावाच्या आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून १४,९०० संशयित विषारी कॅप्सूल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. तपासानुसार, मिरवणुकीत काही लोकांना या कॅप्सूल्स "व्हिटॅमिन" किंवा "इम्युनिटी बूस्टर" असल्याचे सांगून दिल्या जात होत्या. काही नागरिकांना संशय आल्याने त्यांनी कॅप्सूलची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांच्या प्राथमिक तपासात जप्त केलेल्या कॅप्सूलमध्ये झिंक फॉस्फाईड हे उंदीर मारण्यासाठी वापरले जाणारे विषारी रसायन असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या पदार्थाची अधिकृत फॉरेन्सिक तपासणी सुरू असून अंतिम अहवालाची प्रतीक्षा आहे. या प्रकरणात काही जणांनी कॅप्सूलचे सेवन केल्यामुळे त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर आली आहे. संबंधितांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काही रुग्णांवर अद्याप उपचार सुरू आहेत. तपासादरम्यान आरोपीने इंटरनेट, गुगल आणि एआयच्या माध्यमातून विषारी पदार्थांबाबत माहिती शोधल्याचा संशय पोलिसांना आहे. तसेच या प्रकरणामागे आणखी कोणी सहभागी आहे का, किंवा हा मोठ्या कटाचा भाग होता का, याचाही तपास सुरू आहे. मुंबई पोलिसांनी नागरिकांना कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून मिळणाऱ्या औषधांच्या गोळ्या किंवा कॅप्सूल स्वीकारू नयेत, असे आवाहन केले आहे. या प्रकरणातील सर्व बाबींची सखोल चौकशी सुरू असून फॉरेन्सिक अहवाल आणि तपासातून पुढील माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये वटपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला पत्नीपीडित पुरुषांनी घातल्या पिंपळाला 108 उलट्या प्रदक्षिणा

■ **छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,**

वटसावित्री पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज महानगर येथील करोडी शिवारात आज 'पत्नी पीडित पुरुष आश्रमा'च्या वतीने अनोख्या पद्धतीने 'पिंपळ पौर्णिमा' साजरी करण्यात आली. राज्यातील विविध भागांतून आलेल्या पत्नीपीडित पुरुषांनी पिंपळ वृक्षाचे पूजन करून त्याला उलट्या तब्बल 108 प्रदक्षिणा घातल्या. या अनोख्या आंदोलनाच्या माध्यमातून पुरुषांनी आपल्या वैवाहिक आयुष्यातील मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर समस्यांकडे शासन आणि समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

पुरुषांच्या मानसिक आरोग्याच्या मुद्यावर चर्चा

गेल्या सात वर्षांपासून आश्रमाच्या वतीने हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. वटसावित्री पौर्णिमेला महिला पतीच्या दीघार्युष्यासाठी वटवृक्षाची पूजा करतात, तर दुसरीकडे पत्नीकडून त्रासलेले पुरुष या दिवशी एकत्र येत पिंपळाची पूजा करतात. आज झालेल्या या कार्यक्रमादरम्यान उपस्थित पुरुषांनी आपल्या भावना आणि अनुभव मांडले. तसेच कौटुंबिक वादांमुळे पुरुषांच्या वाढत्या आत्महत्येचे प्रमाण, खोट्या तक्रारींमुळे होणारे परिणाम आणि पुरुषांच्या मानसिक आरोग्याचा



मुद्दा यावर गंभीर चर्चा करण्यात आली.

पुरुषांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याची मागणी

कार्यक्रमात बोलताना पत्नी पीडित पुरुष आश्रमाचे अध्यक्ष ॲड. भारत फुलारे यांनी सांगितलं की, 'हा संघर्ष कोणत्याही महिलाविरोधात नसून महिला आणि पुरुष दोघांनाही समान न्याय मिळावा, हीच संस्थेची भूमिका आहे. समाजात महिलांच्या प्रश्नांप्रमाणेच पत्नीपीडित पुरुषांच्या समस्याही गांभीयार्ने घेतल्या जाव्यात, त्यांच्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी राहावी आणि न्यायव्यवस्थेत संतुलित दृष्टिकोन स्वीकारला जावा', अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

किरकोळ वादातून तरुणाची निर्घृण हत्या

छत्रपती संभाजीनगर शहरातील रेल्वे स्टेशनजवळील राजीवनगर परिसरात दारूच्या नशेत झालेल्या किरकोळ वादाचे पर्यवसान थेट खुनात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या वादातून शेखर देविदास लहाने या तरुणाची चाकू आणि विटांनी बेदम मारहाण करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या खळबळजनक घटनेमुळे परिसरात कमालीची दहशत निर्माण झाली आहे.

या झालेल्या भीषण मारहाणीत अनिरुद्ध आराख हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, भांडणादरम्यान जखमी अनिरुद्धकडूनही एका आरोपीवर चाकूने वार झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणात खुनासह खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हाही परस्परविरोधी दाखल केला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आणखी किती दिवस कारणे देणार



पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे भीमराव कांबळे या ६५ वर्षीय नराधमाने एका ४ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केली. या गंभीर आणि अमानुष प्रकरणाचा खटला जलद गती न्यायालयात चालवला गेला. २५ जून या दिवशी या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली असून पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले आहे. २९ जून या दिवशी या खटल्याचा अंतिम निकाल असल्यामुळे या निकालाची सर्वांनाच प्रतीक्षा आहे. या खटल्याचे वैशिष्ट्य, म्हणजे अवघ्या पावणे दोन महिन्यांत खटल्याची सुनावणी पूर्ण होऊन अंतिम निकाल लागणार आहे. चिमुरड्या बालिकेवर लैंगिक अत्याचार करण्याच्या अत्यंत गंभीर गुन्ह्याचा खटला एवढ्या अल्प कालावधीत पूर्ण होणारा महाराष्ट्रातील हा पहिला खटला आहे आणि देशातही असे उदाहरण क्वचितच आढळेल. कोणतीही संवेदनशील व्यक्ती या पशूवत् गुन्ह्यासाठी फाशी दिली जाईल, या अपेक्षेने न्यायालयाच्या निकालाची प्रतीक्षा करत असेल, यात शंका नाही. अर्थात् आरोपीला फाशी देण्यात आली, तरी आरोपीच्या वतीने पुढील न्यायालयात याचिका होण्याची शक्यता आणि त्यामुळे फाशीला विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अन्य प्रकरणांत फाशीची शिक्षा देण्यात आली आहे; मात्र अपील, दयेची याचिका, न्यायालयीन स्थगिती, प्रक्रियेतील त्रुटी आदी विविध कारणास्तव भारतात फाशीची शिक्षा देऊनही प्रत्यक्ष फाशी देण्याची कार्यवाही झालेली नाही, म्हणजेच फाशीसाठी प्रलंबित अशी ५०० हून अधिक प्रकरणे आहेत. शिक्षेच्या या कार्यवाहीला होणारा विलंब ही केवळ न्यायालयीन त्रुटी राहिलेली नाही, तर समाजमनावर याचा होणारा परिणाम अतिशय गंभीर आहे. भीमराव कांबळे या नराधमाने चिमुकलीवर बलात्कार केल्याची घटना उघड झाली, त्यानंतर सर्वच सामाजिक माध्यमांवरील प्रतिक्रिया पाहिल्यास 'गुन्हेगाराला दगडाने ठेचून मारा, तात्काळ गोळ्या घाला, फाशीवर लटकवा, हात-पाय तोडून भर चौकात भीक मागायला लावा', अशा त्या तीव्र स्वरूपाच्या आहेत. या प्रतिक्रिया, म्हणजे समाजमनाची भावना आहे. न्यायालयात प्रकरण गेले की, होणाऱ्या विलंबामुळे समाजाचा न्यायव्यवस्थेवर विश्वास राहिलेला नाही आणि ही स्थिती न्यायव्यवस्थेसह देशासाठीही घातक आहे. त्यामुळे बलात्कार, हत्या यांसारख्या गंभीर घटनांना न्यायासाठी होणारा विलंब हा केवळ काही न्यायव्यवस्थेपुरता मर्यादित विषय राहिलेला नाही. यातून व्यवस्थेप्रती समाजाच्या मनात असंतोष खदखदत आहे. समाजातून व्यक्त होत असलेल्या वरील उत्स्फूर्त प्रतिक्रिया, हे याचेच द्योतक आहे. वर्ष २०१२ मध्ये देहलीत निर्भया या युवतीवर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या प्रकरणी ४ युवकांना मार्च २०२० मध्ये फाशी देण्यात आली. सामूहिक बलात्कार आणि त्यानंतर निर्घृण हत्या यांसारख्या अतीगंभीर गुन्ह्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी ८ वर्षांहून अधिक काळ लागला, हीच न्यायव्यवस्था आणि देश यांसाठी मोठी शोकांतिका आहे. त्या तुलनेत भीमराव कांबळे याने केलेल्या बलात्काराच्या प्रकरणात पावणेदोन मासात शिक्षा होणे, ही न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने जमेची बाजू आहे; परंतु फाशीची शिक्षा झाल्यास आणि आरोपीकडून उच्च न्यायालयात अन् सर्वोच्च न्यायालयात याचिका झाल्यास तेथेही त्यावर जलदगतीने सुनावणी होऊन आरोपीला जेव्हा फाशीची शिक्षा होईल आणि त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही होईल, तेव्हाच हे प्रकरण धसास जाईल, असे म्हणावे लागेल. अन्यथा निर्भया प्रकरणासारखीच या प्रकरणातही आरोपीला शिक्षा होण्यासाठी ९-१० वर्षे लागणार असतील, तर त्या कालावधीनंतर शिक्षेचे गांभीर्य निघून जाते. त्यामुळे समाजाला शिक्षेचे ज्याप्रकारे भय असायला हवे, ते रहात नाही. निर्भया बलात्कार प्रकरण त्या वेळी अतिशय निर्दयी वाटत होते; परंतु त्यानंतरही श्रद्धा वालकर हिच्या मृतदेहाचे तुकडे करून ते शीतकपाटात ठेवण्यासारख्या अनेक घटना घडल्याच ना! उत्तरप्रदेशमधील हाथरस येथे १९ वर्षीय दलित युवतीवर बलात्कार करून तिची जीभ कापणे, उत्तरप्रदेशामध्ये वर्ष २०१७ मध्ये उन्नाव येथे एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिच्यासह तिच्या नातेवाइकांची केलेली हत्या, तर वर्ष २०१८ मध्ये जम्मू-काश्मीरमधील कठुआ येथे एका अल्पवयीन मुलीला खोलीत डांबून तिच्यावर वारंवार बलात्कार करून तिची करण्यात आलेली हत्या, यानंतर वर्ष २०१९ मध्ये भाग्यनगरमध्ये महिला पशूवैद्यकीय डॉक्टरचे अपहरण करून तिच्यावर झालेला सामूहिक बलात्कार आणि त्यानंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे करून ते जाळणे, अशी शेकडो प्रकरणे निर्भया बलात्कार प्रकरणानंतरही देशात घडली आहेत. यांतील काही प्रकरणांमध्ये २-३ वर्षांत शिक्षा झाली, ही वस्तूस्थिती आहे; परंतु अशा अमानुष प्रकरणांमध्ये शिक्षेला होणारा २-३ वर्षांचा कालावधीही मोठा आहे. अशा अमानुष प्रकरणांची सुनावणी लवकरात लवकर व्हावी, यासाठी जलदगती न्यायालये निर्माण झाली खरी; परंतु त्यानंतर २५ वर्षांनंतरही जलदगती न्यायालयांची गतीही मंदावली आहे. जलदगती न्यायालयातच सहस्रो खटले प्रलंबित आहेत आणि त्यांचा कालावधी ८-१० वर्षांपर्यंत आहे. ही स्थिती, म्हणजे न्यायालयाचा अवमान अन्य कुणी करण्याचीच आवश्यकता नाही. न्याय मिळण्यासाठी वर्षानुवर्षे होत असलेला हा विलंब, ही न्यायव्यवस्थेने स्वतःचीच चालवलेली चेष्टा होय. काही वर्षांपूर्वी न्यायव्यवस्थेविषयी एखादा उद्गार काढायचा झाला, तर त्यातून न्यायव्यवस्थेचा अवमान तर होणार नाही ना? अशी भीती असायची; सध्या मात्र न्यायव्यवस्थेची इतकी घसरण झाली आहे की, सामाजिक माध्यमांवर न्यायव्यवस्थेवर यथेच्छ टीका केली जाते. एवढेच नव्हे, तर निवृत्तीनंतर काही न्यायमूर्तींनीही न्यायव्यवस्थेच्या विदारक स्थितीविषयी सडकून टीका केली आहे. या सर्वच प्रकाराविषयी न्यायव्यवस्था आणि केंद्र सरकार यांनी वेळीच गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. न्यायाधिशांची अपुरी संख्या आणि गुन्ह्यांची वाढती संख्या, ही कारणे आणखी किती दिवस द्यायची? हे कधीतरी ठरवावे लागेल. अन्यथा बलात्कार्याला न्यायालयाने शिक्षा देण्यापेक्षा पोलिसांनी चकमकीत ठार मारणे, हेच लोकांना अधिक भावेल. हे टाळण्यासाठी गंभीर गुन्ह्यांचा निकाल जलदगतीने लागणे आणि त्याची तात्काळ प्रभावी कार्यवाही होणे, हे जसे महत्त्वाचे आहे, त्याचप्रमाणे समाजात वाढत असलेली विकृती, अमानुषता आणि राक्षसी वृत्ती, तसेच अल्पवयातच युवक-युवतींचा गुन्हेगारीकडे वाढता कल रोखणे, हेही महत्त्वाचे आहे. 'वेळेत न्याय आणि त्याची प्रभावी कार्यवाही, हाच खरा न्याय आहे', हे सूत्र लक्षात घेऊन न्यायव्यवस्थेत आमूलाग्र पालट होणे आवश्यक आहे अन् समाजातील गुन्हेगारी रोखण्यासाठी नैतिकतेचे शिक्षण देणे, हेही तितकेच आवश्यक ठरेल.

भारत माझा(ही) देश आहे...

२४ जून या दिवशी पारपत्र सेवा दिवस झाला. त्या निमित्ताने एका चर्चेच्या वेळी परराष्ट्र मंत्रालयाने पारपत्र हा भारतीय नागरिकत्वाचा पुरावा नसल्याचे सांगितले आणि एकच गोंधळ उडाला. तो स्वाभाविक होता; कारण मोठ्या पडताळणी प्रक्रियेनंतर पारपत्र हातात पडते. ज्या अर्थी पारपत्रासाठी एवढी कसून पडताळणी केली जाते, त्या अर्थी नागरिकत्वाचा हाच मुख्य महत्त्वाचा पुरावा आहे, असे कुणालाही वाटू शकते; परंतु इथेच खरी गल्लत होते. कष्ट करून पोट भरणारा, प्रतिवर्षी सरकारी कराची रक्कम जमा करणारा सामान्य भारतीय स्वतःकडील जुनी कागदपत्रेही व्यवस्थितरित्या सांभाळतो. निवडणुकीच्या वेळी तो निवडणूक ओळखपत्राचा उपयोग करतो, स्वस्त धान्य दुकानात रेशनकार्डचा, वाहन चालवतांना वाहन परवाना वापरतो, तर कर भरतांना, अधिकोषांशी संबंधित कामे करतांना पॅनकार्डचा वापर करतो. त्या त्या ठिकाणी आवश्यक ते कागदपत्र तो उपस्थित करून काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. अर्थात प्रशासन वेळोवेळी योग्य ती माहिती एकाच वेळी उपलब्ध करून देत नसल्याने होर्णाया गैरसोयीमुळे नागरिक त्रस्त असतात, हे निराळे; पण सरतेशेवटी वेगवेगळी कागदपत्रे जमवून काम पूर्ण करण्यासाठीची धडपड असते. होर्णाया गैरसोयीला वाचा फोडण्यासाठी त्याचे प्रामाणिक प्रयत्नही असतात. असा हा भारतीय नागरिक! अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असले, तरी राष्ट्रीयदृष्ट्या आवश्यक ते ते तो करतो.

अलीकडे मात्र राष्ट्रीयदृष्ट्या आवश्यक असलेली धोरणे, कायदे यांना मोठा विरोध तरी होतो किंवा त्याविषयी गोंधळ निर्माण होतांना दिसतो. पारपत्राच्या संदर्भातील माहितीनेही तेच झाले. पारपत्र नागरिकत्वाचा पुरावा नाही, तर भारतीय असल्याचा एकच एक पुरावा कोणता? लोकांनी प्रत्येक ठिकाणी कागदपत्रांची गाठोडी फिरवत बसायचे का? सरकार नवनवीन नियम काढते? हवे तसे सरकार चालू आहे... या नि अशा टीका-टिपण्या विरोधी पक्ष करू लागले. लागलीच या सूत्राने राजकीय रूप धारण केले. आरोपांच्या फैरी झाडल्या गेल्या. येथे हुशारी म्हणजे सामान्य माणसाला जे भोगावे लागते, त्याचा आधार घेत टीका होत असल्याने सामान्यांनाही 'ते' आपल्याच बाजूने बोलत आहेत, असे वाटते. प्रत्यक्षात परिस्थिती निराळीच आहे.

घुसखोर हीच समस्या!

हज यात्रेसाठी भारतातून प्रतिवर्षी सरासरी पावणे २ लाख जण जातात. त्यातील भारतीय मुसलमान किती आहेत? हा प्रश्नही उद्भवतोच; कारण सरकारच्या वतीने हज यात्रेसाठी जाणारे, हज यात्रा कमिटीच्या वतीने जाणारे आणि खासगी पर्यटन आस्थापने यांच्या वतीने हज यात्रेला जाणारे यांच्या संख्येत भेद आढळतो. नागरिकत्वाच्या चर्चेत हजला जार्णाया मुसलमानांना मध्ये आणायचा काय संबंध? असे वाटू शकते. त्याचे कारण म्हणजे एका आकडेवारीनुसार एकट्या महाराष्ट्रात ८० लाख, तर देशात १० कोटी बांगलादेशी मुसलमान घुसखोर आहेत. मुंबईत पैसे घेऊन बांगलादेशी घुसखोरांना अभय दिले जात असल्याचे हल्लीच समोर आले. महाराष्ट्र आतंकवादविरोधी पथकानेही नुकतीच ३० सहस्रांहून अधिक बांगलादेशी घुसखोरांची सूची महाराष्ट्र सरकारकडे सोपवली. मुंबईतील जवळजवळ १ सहस्र ५०० हून अधिक भागांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचे अड्डे आढळले असून केवळ मुंबईत १६-१७ सहस्रांहून अधिक घुसखोर सापडले आहेत. चिंताजनक म्हणजे मुंबईत बांगलादेशी घुसखोर सापडले नाहीत, असे आता एकही ठिकाण राहिलेले नाही. एकंदरीत परिस्थिती पहाता याहून कितीतरी पटींनी अधिक बांगलादेशी घुसखोर मुंबईसह उपनगरांमध्ये सापडण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय महामार्ग, शहरे-गावे यांकडे जाणारे मुख्य रस्ते यांवर फळे, गॉगल, भाज्या, छोट्या-मोठ्या वस्तू विकर्णायांमध्ये मुसलमानांची संख्या मोठी आढळते. देशातील मुख्य बाजारपेठांमधील व्यार्पायांमध्येही मुसलमानांची संख्या अधिक आहे. मागील १० वर्षांपर्यंत एखाद्या शहरात क्वचित् आढळर्णाया अनुमाने १०० मुसलमान कुटुंबाची संख्या अल्पावधीत सहस्रोंच्या घरात गेलेली आढळते. अनेक मोक्याच्या ठिकाणी त्यांच्या अवैध झोपडपट्ट्याही दिसून येतात. देशात वाढलेली घुसखोरांची भली मोठी संख्या सरकार अथवा प्रशासन यांना कारवाई करता येण्याच्या आवाक्याच्या बाहेरची झाली आहे; म्हणून अद्याप त्यांच्यावर ठोस कारवाई होत नाही, याचे उत्तर सरकार आणि प्रशासन हेच देऊ शकतात. रहाता राहिला सामान्यांसाठी एकच कागदपत्र नागरिकत्वाचा पुरावा म्हणून असण्याचा, तर सरकारने राष्ट्रीय नागरिकत्व प्रमाणपत्र आणण्याचा प्रयत्न केला होताच. 'कागज नहीं दिखाएंगे'च्या घोषणा देत त्याला झालेला विरोध जाळपोळीच्या रूपात देशात ठिकठिकाणी पहायला मिळाला. एकीकडे नागरिकत्वाच्या एकाच कागदपत्राविषयी सामान्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून टाहो फोडायचा आणि दुसरीकडे नागरिकत्व प्रमाणपत्राला विरोध करायचा, या दुधारी शस्त्राचा वापर भारताविरुद्ध केला जात आहे.

समजा 'राष्ट्रीय नागरिकत्व प्रमाणपत्र' सोडून नागरिकत्वासाठीचा एकच पुरावा आताच्या स्थितीत देण्याचा विचार केला, तरी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने म्हणा, भ्रष्ट बुद्धीने म्हणा अथवा राष्ट्रीय हिताला बाधा आणर्णायांच्या युक्त्यांनी म्हणा, कोणतेही कागदपत्र आज सहजतेने बनावट बनवता येते. बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय म्हणून ओळख देर्णायांची आणि योजना उपभोगर्णायांची संख्या भारतात लाखोंच्या घरात आहे. अशा स्थितीत नागरिकत्वाचा एकच पुरावा दिल्याने लाभ होईल का? हाही प्रश्न आहे. वरील गोष्टींचा विचार करता सध्या चालू असलेल्या पारपत्राच्या संदर्भातील गोंधळात राष्ट्रहिताला यत्किंचितही स्थान नाही, हे राष्ट्रप्रेमी भारतियांनी ओळखायला हवे. तसेच सामान्य भारतियांचा कामांतील होणारा खोळंबा आणि त्यांची त्रस्तता लक्षात घेऊन होणारा त्रास पहाता सरकारने योग्य उपाययोजना काढणे आवश्यक आहेच.

पितृभू, पुण्यभू भारत !

कागदपत्राने नागरिकत्व सिद्ध करण्याची प्रथा भारतात ब्रिटिशांनी आणली. तोपर्यंत भारतीय असण्याचा पुरावा 'राष्ट्रप्रेम' इतकाच होता. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी 'सिंधुनदीपासून दक्षिणेस महासागरापर्यंतची भूमी ज्याची पितृभूमी आणि पुण्यभूमी आहे, तो 'हिंदु'! या देशाला आपली 'पितृभू' आणि 'पुण्यभू' मानणारे सर्व लोक हिंदूच आहेत. 'हिंदु' ही राष्ट्रीयत्वाची व्याख्या आहे', असे जे सांगितले, त्यातच सर्वकाही येते. ज्याची कर्मभूमी, पुण्यभूमी, जन्मभूमी, मातृभूमी, प्राणप्रिय भूमी भारत हीच आहे, तो भारतीय! भारतभूमीला वंदन करर्णाया 'वन्दे मातरम्'ला विरोध करणारे कोण आहेत, हे भारतियांना समजून घ्यावे लागेल. जागतिक अस्थिरतेच्या काळात राष्ट्रीय हितावियी संभ्रम निर्माण करर्णायांनाही भारतियांना ओळखावे लागेल.



पासपोर्ट हा नागरिकत्वाचा अंतिम पुरावा नसल्याचे परराष्ट्र मंत्रालयाच्या विधानानंतर भारतीय नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी नेमका कोणता दस्तावेज ग्राह्य धरला जातो, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. आधार, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र किंवा पासपोर्ट यांपैकी कोणतेही एकटे नागरिकत्व सिद्ध करत नाही.

पारपत्राचा अनावश्यक गोंधळ!

भारताचे नागरिक नेमके कोण आणि ते सिद्ध करण्याचा पुरावा नेमका काय, हा सध्या देशातला सर्वांत जटिल प्रश्न होऊन बसला आहे. बालपणापासून 'भारत माझा देश आहे,' अशी प्रतिज्ञा म्हणत आलेल्या अनेक पिढ्यांना इतकी वर्षे आपण भारताचे नागरिक आहोत की नाही, याबाबत कधीच शंका आली नव्हती; पण सध्या वेगवेगळ्या सरकारी यंत्रणांना आपल्याच नागरिकांबाबत वारंवार प्रश्न पडू लागले आहेत. त्यांचे उत्तर देण्यासाठी फार पूर्वी रेशनकार्ड चालून जायचे; नंतर आर्थिक व्यवहारांसाठी पॅनकार्ड आले, मतदान करण्यासाठी मतदार ओळखपत्र आले आणि संयुक्त पुरोगामी सरकारच्या काळात बहुपयोगी 'आधार'सुद्धा कोट्यवधी नागरिकांनी काढले. अजूनही या सर्वांमध्ये पासपोर्ट हा भारतीय नागरिकांसाठी भरभक्कम आधार मानला जातो. मात्र, परराष्ट्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या एका विधानामुळे देशात संभ्रम निर्माण झाला आहे. 'पासपोर्ट सेवा दिनी'च या विभागाच्या वतीने 'पासपोर्ट हा नागरिकत्वाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरू नये,' असे ठासून सांगण्यात आले. परराष्ट्र विभागाच्या विधानात कायदेशीर तथ्य आहे; तसेच सर्वोच्च व उच्च न्यायालयांनीही तसे वेळोवेळी म्हटले आहे. नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी 'काय चालणार नाही,' हे यातून समजते; पण 'कोणता पुरावा चालेल,' याचे 'अधिकृत' आणि सुस्पष्ट उत्तर सर्वसामान्य नागरिकांना हवे आहे. आपण भारतीय नागरिक असल्याचे सिद्ध करण्याची गरज अपवाद वगळता आजवर फारशी भासली नव्हती. काही काळापूर्वी राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणीच्या (एनआरसी) निमित्ताने आसाममधील नागरिकांवर ती वेळ आली. गेल्या वर्षी बिहार, पश्चिम बंगालसह अन्य राज्यांमध्ये सुरू झालेली मतदारयादीची सखोल पडताळणी (एसआयआर) आणि जोडीला 'घुसखोरी'विषयक प्रचार, यांमुळे नागरिकत्वाचा मुद्दा प्रकर्षाने चर्चेत आला. नागरिकत्व निश्चितीचा अंतिम अधिकार निवडणूक आयोगाला नसला, तरी केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) दारी उभा राहिल्यावर अनेकांची विनाकारण गाळण उडते, ही वस्तुस्थिती आहे. 'आधार' हा फक्त ओळखीचा पुरावा आहे, असे न्यायालयाने पूर्वीच स्पष्ट केले असून, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र ही विशिष्ट उद्देशांनी वापरली जाणारी कागदपत्रे आहेत. आजवर पासपोर्ट हा नागरिकत्वाचा बळकट पुरावा मानला जात असे, तोसुद्धा 'गैरसमज' असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. पासपोर्ट हा सन १९६७च्या पासपोर्ट कायद्यानुसार मिळणारा दस्तावेज आहे; तर नागरिकत्व हे भारतीय नागरिकत्व कायद्यानुसार (१९५५) निश्चित केले जाते. त्यानुसार नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कोणतेही एक कागदपत्र पुरेसे नसून, जन्मदाखला, पालकांचे नागरिकत्व, शाळेच्या-जमीन किंवा रहिवास नोंदी आणि पासपोर्ट अशा निरनिराळ्या कागदपत्रांचा त्यासाठी एकत्रित विचार केला जातो. काही वर्षांपूर्वी तीन जणांनी पासपोर्ट, आधार आणि जन्मदाखला यांच्या आधारे केलेला नागरिकत्वाचा दावाही न्यायालयाने फेटाळला आहे. या विभागांची भूमिका कागदावर योग्य वाटते. मात्र, सरकारचे वेगवेगळे विभाग परस्परविरोधी भूमिका घेतात, त्याचे काय? पासपोर्ट हा सर्व कागदपत्रे-पुराव्यांची, म्हणजेच ती व्यक्ती भारताची नागरिक असल्याची खातरजमा न करताच दिला जातो का, हा प्रश्न बाळबोध वाटला, तरी त्यात तथ्य आहेच. एकीकडे सरकारचे परराष्ट्र खाते पासपोर्टबाबत एक भूमिका मांडते; त्यावर सरकार चिडीचूप राहते आणि सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या 'आयटी सेल' चे प्रमुख 'सरकारच्या वतीने' त्यावर खुलासा करतात, हा प्रकार गोंधळ उडवून देणारा असून, सत्ताधाऱ्यांचे ध्रुवीकरणाचे राजकारण व 'घुसखोरी'चा प्रचार त्यात भर घालणारा आहे. त्यामुळेच बहुसंख्य भारतीयांना चकित आणि सीमावर्ती राज्यांतील व कोणतीही कागदपत्रे नसलेल्या गरीब-निरक्षर व ग्रामीण भागातील नागरिकांना भयकंपित करणाऱ्या या प्रश्नांची तातडीने उत्तरे देणे गरजेचे आहे. नागरिकांना सतत भीतीच्या सावटाखाली ठेवणे योग्य नाही. अनावश्यक वितंडवादाऐवजी नेमक्या विधायक सूचना त्यासाठी महत्त्वाच्या आहेत. नागरिकत्व सिद्ध करणारे एकमेव कागदपत्र सध्या उपलब्ध नसले, तरी काँग्रेसचे नेते शशी थरूर यांनी केलेल्या 'वैध' आधार आणि पासपोर्ट यांचा त्यासाठी विचार व्हावा, अशा सूचनांसह अन्य देशांमधील नागरिकत्वनिश्चितीच्या पद्धतींचा अवश्य विचार करून संसदेत सोपा व सुस्पष्ट कायदा गरजेचा आहे. 'वुई दि पीपल ऑफ इंडिया...' हे घटनेच्या प्रस्तावितेतील वाक्य सार्थ ठरवण्यासाठी तरी ते आवश्यक आहे.

मोदींच्या व्यापारदृष्टीने खुली केली जगाची दालने

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली, आज या अस्थिर जगात भारताकडे एक लवचिक अर्थव्यवस्था आणि एक विश्वासू भागीदार म्हणून जगभरात आदराने पाहिले जाते. भारताने आकर्षक बाजारपेठ असलेला एक विश्वसनीय भागीदार म्हणून स्वतःला प्रस्थापित केले आहे.

युनायटेड किंगडमसोबतचा ऐतिहासिक व्यापार करार १५ जुलै रोजी अंमलात येत असून, हा करार जागतिक संधी निर्माण करेल आणि भारतीय शेतकरी, एमएसएमई, मच्छिमार, स्टार्टअप्स आणि कारागिरांसाठी समृद्धी घेऊन येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ च्या मोहिमेला पुढे नेण्यासाठी हा करार अनेक रोजगार निर्माण करेल आणि भारतीय नागरिकांसाठी रास्त दरात उच्च दर्जाच्या वस्तू उपलब्ध करून देईल. भारत आणि यूके यांच्यातील हा परिवर्तनकारी सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार विविध क्षेत्रांतील, विशेषतः श्रम-प्रधान क्षेत्रांतील भारतीय वस्तूंसाठी युनायटेड किंगडमच्या बाजारपेठेत सर्वसमावेशक प्रवेश सुनिश्चित करेल. दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरणारा हा करार शुल्क आकारणीच्या जवळपास ९९% श्रेणींवरील आयात शुल्क काढून टाकेल. यात एकूण व्यापार मूल्याचा जवळपास १००% वाटा समाविष्ट असल्याने भारतीय निर्यातीसाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होतील. हा सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार लोककेंद्रित करार आहे. या करारावर गेल्या वर्षी पंतप्रधान मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान सर कीर स्टारमर यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली होती. समाजातील सर्व घटकांना फायदे मिळवून देणारा हा करार आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या देशांतर्गत हितसंबंधांसोबत कोणतीही तडजोड न करता उच्च दर्जाच्या निर्यात बाजारपेठांमध्ये प्रवेश करणे शक्य होणार आहे. युनायटेड किंगडमच्या मोठ्या प्रमाणात विस्तारलेल्या बाजारपेठेत सागरी खाद्यपदार्थांची निर्यात वाढल्यामुळे मच्छिमार बांधवांना फायदा होईल. श्रम-प्रधान क्षेत्रांमध्ये कामगारांना रोजगाराच्या नवीन संधी मिळतील. महिला उद्योजक, तरुण, स्टार्टअप्स आणि एमएसएमई यांना जागतिक मूल्य साखळीत अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश मिळेल. तसेच, व्यावसायिक लोकांना वाढीव गतिशीलता आणि स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या नवीन संधींचा लाभ मिळेल.

शेतकऱ्यांची भरभराट होणार : सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार इतर युरोपीय देशांना मिळणाऱ्या फायद्यांच्या तोडीस तोड किंवा त्याहून अधिक फायदे मिळवून देत भारतीय शेतकऱ्यांसाठी युनायटेड किंगडमची अतिशय उच्च दर्जाची बाजारपेठ खुली करणारा आहे. हळद, मिरी, वेलची आणि आमरस, लोणची व डाळी यांसारख्या प्रक्रिया केलेल्या वस्तूंना शुल्कमुक्त प्रवेश मिळेल. उच्च कृषी निर्यातीमुळे शेतीतील उत्पन्नाला चालना मिळेल आणि गुणवत्ता, पॅकेजिंग (वेष्टन) व प्रमाणीकरण वाढवण्यासाठी मोठे प्रोत्साहन मिळेल. यामुळे कृषी मूल्य साखळीत अनेक रोजगारही निर्माण होतील. त्याचवेळी, देशांतर्गत शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, विशेषतः दुग्धजन्य पदार्थ, तृणधान्ये, भरड धान्ये, सफरचंद, ओट्स आणि खाद्यतेल या क्षेत्रांशी संबंधित असलेल्या शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी, सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार कराराने भारताच्या अत्यंत संवेदनशील कृषी क्षेत्रांना यातून वगळले आहे. या क्षेत्रांना वगळण्याचे धोरण अन्न सुरक्षा, देशांतर्गत किमतींचे स्थैर्य आणि असुरक्षित शेतकरी समुदायांना प्राधान्य देण्याची मोदी सरकारची रणनीती प्रतिबिंबित करते.


उद्योगांना चालना : युनायटेड किंगडमच्या विस्तीर्ण बाजारपेठेत त्वरित मिळणाऱ्या शुल्कमुक्त प्रवेशामुळे भारतीय उत्पादनाला गती मिळेल, ज्यामुळे पारंपरिक कारागीर, मोठे कारखाने आणि प्रादेशिक औद्योगिक केंद्रांना प्रभावीपणे स्पर्धा करणे शक्य होईल. भारतीय उत्पादने प्रतिस्पर्धी उत्पादनांच्या तुलनेत अगदी स्पष्टपणे चांगली ठरल्यामुळे लहान व्यवसायांची भरभराट होऊ लागेल. इतर उत्पादनांसह फुटबॉल, क्रिकेटचे साहित्य, रग्बी बॉल्स आणि खेळणी बनवणाऱ्या कंपन्या युनायटेड किंगडममध्ये आपला व्यवसाय लक्षणीयरीत्या वाढवण्यासाठी सज्ज आहेत. शुल्क हटवल्यामुळे दीर्घकाळापासून असलेले करांचे अडथळे दूर झाले आहेत. विशेषतः श्रम-प्रधान क्षेत्रांमधील अडथळे दूर झाले असून, यामुळे नियार्तीतील स्पर्धात्मकता आणि व्याप्तीमध्ये त्वरित नफा मिळण्याची अपेक्षा आहे. तिरुपूरच्या हातमागांपासून ते बंगळुरूच्या प्रयोगशाळांपर्यंत आणि सूरतमधील हिऱ्यांच्या कारागिरांपासून ते हैदराबादमधील संगणक प्रोग्रामरपर्यंत, हा करार खऱ्या अर्थव्यवस्थेशी संपर्क प्रस्थापित करतो.



सेवा आणि व्यावसायिक : युनायटेड किंगडमने भारताच्या नियार्तीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या सर्व प्रमुख सेवा क्षेत्रांचा आणि १३७ उप-क्षेत्रांचा समावेश असलेली आतापर्यंतची आपली सर्वात मोठी वचनबद्धता या कराराद्वारे दिली आहे. बाजारपेठेतील सुधारित प्रवेश आणि नियामक निश्चिततेमुळे माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या सेवा, वित्तीय सेवा, व्यावसायिक सेवा, आरोग्य सेवा, शिक्षण, अभियांत्रिकी, दूरसंचार आणि सल्लागार सेवांमधील भारतीय सेवा पुरवठादारांना मोठे पाठबळ मिळेल. भारताने कंत्राटी सेवा पुरवठादार, व्यावसायिक प्रवासी, गुंतवणूकदार, योग शिक्षक, संगीतकार आणि शेफ यांच्यासह कुशल व्यावसायिकांसाठी दोन्ही देशांदरम्यान ये-जा करण्यासाठी (गतिशीलतेसाठी) सुलभ ठरतील अशा प्रकारच्या व्हिसा आणि प्रवासाच्या नियमांमधील सवलतींच्या अटी निश्चित केल्या आहेत. हा करार व्यावसायिक अभ्यागत, कंपनींतर्गत बदली झालेले कर्मचारी, कंत्राटी सेवा पुरवठादार, स्वतंत्र व्यावसायिक आणि गुंतवणूकदार यांच्यासाठी त्यांना अपेक्षित असलेले आणि सुलभ प्रवासाचे मार्ग देखील उपलब्ध करून देतो. शिवाय, या करारानुसार दरवर्षी एक हजार ८०० भारतीय शेफ, योग शिक्षक आणि शास्त्रीय संगीतकारांना विशेष प्रवासाच्या व गतिशीलतेच्या संधींचा लाभ घेता येईल.

नावीन्यपूर्ण मुक्त व्यापार करार : पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली, मुक्त व्यापार करार वस्तू आणि सेवांच्याही पलीकडे जाऊन नवीन मानके प्रस्थापित करत आहेत. स्वित्झर्लंड, नॉर्वे, आइसलँड आणि लिकटेंस्टीन या 'इफ्टा' देशांसोबत भारताने १०० अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीच्या वचनबद्धतेची हमी मिळवली आहे, ज्यामधून १० लाख थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. न्यूझीलंडसोबतच्या मुक्त व्यापार करारात भारताने १५ वर्षांत २० अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीची हमी मिळवली आहे, तर ऑस्ट्रेलियासोबतच्या मुक्त व्यापार कराराने भारतीय आयटी कंपन्यांना सतावणारी दुहेरी कर आकारणीची समस्या दूर केली आहे. युनायटेड किंगडमसोबतच्या या कराराचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे दुहेरी योगदान करार आहे. सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारासोबतच अंमलात येणारी ही ऐतिहासिक व्यवस्था, भारतीय कामगार आणि त्यांच्या कंपन्यांना किंवा नियोक्त्यांना तात्पुरत्या नियुक्तीच्या काळात युनायटेड किंगडममध्ये दुहेरी सामाजिक सुरक्षा योगदान भरण्यापासून सूट देते. तात्पुरत्या परदेशी नियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी सतत सामाजिक सुरक्षा संरक्षण मिळाल्यामुळे ७५ हजारपेक्षा जास्त भारतीय व्यावसायिकांना आणि ९०० पेक्षा जास्त कंपन्यांना याचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

सरकारची रणनीती : २०१४ मध्ये देशाची अर्थव्यवस्था अडचणीत होती आणि संभाव्य गुंतवणूकदार आपला विश्वास गमावत होते. धोरणात्मक शिथिलता आणि महाकाय आकारमानाच्या रकमेचे भ्रष्टाचार यांनी गाजलेल्या एका दशकानंतर, भारताची गणना जगातील 'फ्रॅजा



रताळ्याचा शिरा

▮ **साहित्य :** रताळे - 5 ते 6, गूळ - 1 वाटी, तूप - आवश्यकतेनुसार, सुकामेवा - गरजेनुसार

▮ **कृती :** रताळ्याचा शिरा बनवण्यासाठी रताळी स्वच्छ धुवून कुकरमध्ये शिजवून घ्यावीत. त्यानंतर रताळी थंड करून साल करून बारीक कुस्करावीत. यानंतर एका पॅनमध्ये तूप गरम करून त्यात गूळ टाकूळन विरघळेपर्यंत ढवळत राहा. आता यात कुस्करलेले रताळे घाला. सतत ढवळत राहा, जेणेकरून पॅनला मिश्रण चिकटणार नाही. सर्वात शेवटी सुकामेवा त्यात मिक्स करा. तयार झाला आहे वटपौर्णिमा स्पेशल रताळ्याता शिरा

पावसाळा सुरू झाला की, त्वचेच्या समस्या डोके वर काढतात. त्वचेवर रॅश येणे, संसर्ग होणे, लालसरपणा, खाज अशा समस्या निर्माण होतात आणि यापासून बचाव करण्यासाठी नेमके काय करावे हे आपल्याला कळत नाही. मात्र काही घरगुती उपायांनी या समस्येवर उपाययोजना करता येणे शक्य आहे, ज्यामुळे तुमची त्वचा नैसर्गिक आणि चांगली राहील. काय आहेत हे उपाय जाणून घेऊया...



पावसाळ्यात त्वचेला जपण्यासाठी 'हे' आहेत खास उपाय

▮ **तुळस :** पावसाच्या दिवसांत अनेकांना ॲलर्जी किंवा खाज येण्याची समस्या उद्भवते. तुळस ही अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी बॅक्टेरियल असते. हवेच्या कोणत्याही बदलाशी सामना करताना तुळस उपयुक्त ठरते. आपल्याला ज्याठिकाणी त्रास झाला आहे त्याठिकाणी तुळशीचा रस किंवा पेस्ट लावल्यास फायदेशीर ठरते. या रसाने चेहरा धुतल्यास चेहऱ्याच्या सगळ्या समस्या दूर होण्यास मदत होते.

▮ **हळद :** आयुर्वेदात हळद हे अनेक गोष्टींवरील उपयुक्त असे औषध समजले जाते. अँटीसेप्टीक म्हणून ओळखली जाणारी हळद त्वचेच्या समस्येवरील उत्तम उपाय आहे. चेहऱ्यावर कोणताही संसर्ग किंवा ॲलर्जी आली असल्यास तो नष्ट करण्यासाठी हळद अतिशय उत्तम काम करते.



▮ **कोरफड :** कोरफडीचे अनेक उपयोग आपल्याला माहीत आहेत. बाजारात मिळणाऱ्या अनेक क्रीममध्येही कोरफडीचा वापर केला जातो. त्वचेला कोणत्याही प्रकारची ॲलर्जी झाली असल्यास कोरफड त्यावर उपयुक्त ठरते. त्वचेची होणारी जळजळ कोरफड लावल्याने कमी होते.

▮ **जिरे :** त्वचेच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी जिरेही अतिशय उपयुक्त असते. दिवसात ३ ते ४ वेळा पाण्याबरोबरच जिरे घेतल्यास त्वचेच्या समस्या दूर होण्यास मदत होते. जिऱ्यात ई-जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असते, ज्यामुळे त्वचा चांगली राहते. पावसाच्या दिवसात होणारे त्वचेचे त्रास जिऱ्यामुळे कमी होतात.



सतत खुर्चीवर बसून काम करत असाल, तर हे वाचाच

ऑफिसमध्ये सतत एकाच खुर्चीवर, जागेवर बसणं शरीरासाठी नुकसानकारक आहे. अशा प्रकारच्या बसण्यामुळे त्याचा आरोग्यावर नकारात्मक, विपरीत परिणाम होत असतो. सतत टीव्ही पाहणं, कॉम्प्युटर, स्मार्टफोनवर पाहतं राहणंदेखील शरीराला नुकसान पोहोचवत असतं. काही महिन्यांपूर्वी केल्या गेलेल्या संशोधनातून याबाबत आश्चर्यचकित करणारी तथ्य समोर आली आहेत.



अमेरिकेतील मेयो येथील एका क्लीनिकमधून याबाबत संशोधन करण्यात आले. या संशोधनातून शारीरिक असक्रियता धूम्रपानाइतकीच घातक असल्याचं सांगण्यात आलं आहे.

संशोधनानुसार, खांदे, पाठ, कंबरदुखीच्या समस्येपासून ते अगदी टाइप-२च्या डायबिटीज, हृदयरोग, कॅन्सर यांसारख्या आजारांपासून स्वतःचं रक्षण करण्यासाठी चालण्या-फिरण्याचा, व्यायाम करणं आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. दिवसभर बसण्याची किंवा पडून राहण्याची सवय स्मरणशक्तीसाठी घातक असल्याचीही शक्यता संशोधनातून वर्तवण्यात आली आहे. संशोधनादरम्यान, अधिकतर युवक जवळपास ८ तासांपर्यंत खुर्चीवर बसत असल्याचं, तसंच टीव्ही किंवा मोबाईल पाहण्यासाठी एकाच जागेवर ३ तास बसून असल्याचं समोर आलं.

शारीरिक स्वास्थ्य निरोगी राखण्यासाठी, दररोज जवळपास १० हजार पाऊलं चालणं आवश्यक आहे. आठवड्यातून ६ दिवस कमीत कमी अर्धा तास व्यायाम करणं गरजेचं आहे.

संशोधनकर्त्यांनी ऑफिसमध्ये एकाच जागी बसण्याबाबत काही उपाय सुचवले आहेत –

▮ ऑफिसमध्ये पाण्याची बाटली भरून न ठेवता, तहान लागल्यास जागेवरून उठून पाणी प्यावे.

▮ ऑफिसमध्ये शक्य असल्यास आपल्या जागेवरच किंवा दुसऱ्या ठिकाणी स्ट्रेचिंग करावे.

▮ नाश्ता किंवा जेवणासाठी शक्यतो कँटिनमध्ये जावे. जागेवरच खाऊ नये.

▮ शक्य असल्यास लिफ्टच्या ऐवजी पायऱ्यांचा वापर करावा.



मधुमेहींसाठी उपयुक्त पामर किंवा जांभूळ आंबा

उन्हाळ्याचे दिवस हे रसदार, रसाळ आंब्याचे दिवस तर पावसाळ्यात जांभळे खाण्याची मजा काही औरच. ही दोन्ही फळे ज्यांना मनापासून आवडतात त्यांना या दोन्ही फळांची चव एकाच फळात मिळाली तर? होय या दोन्ही फळांची चव एकत्र चाखण्याची संधी आता भारतीयांना साधता येणार आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यात विकसित झालेला जांभूळ आंबा, मूळ नाव पामर मँगो, आता उत्तर प्रदेशात काही ठिकाणी लावला गेला आहे. हा आंबा मधुमेहींसाठी खूपच उपयुक्त असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत.

या जातीचे सगळ्यात पहिले रोप १९२५ साली मियामी येथे लावले गेले होते. २००१ पासून या इंटरनेटवर या विशेष आंब्याची चर्चा होते आहे. ब्राझीलमध्ये या जातीच्या आंब्याचे मोठे उत्पादन घेतले जाते. आता भारतात या जातीच्या आंब्याची लागवड केली जात असल्याचे समजते. सोशल मीडियावर त्यासंदर्भात बातम्या येत आहेत.

या आंब्याचा रंग फिकट जांभळा असून जांभूळ आणि आंबा या दोन झाडांच्या संयोगातून ही जात विकसित गेली आहे असे सांगितले जात आहे. या आंब्याची चव आंबा आणि जांभूळ यांचे मिश्रण आहे.

या आंब्यात अँटीऑक्सिडंट आहेत. याच्या सेवनाने पचन सुधारते, रक्त शुद्ध होते त्यामुळे त्वचा रोग दूर होतात, रक्तशर्करेचे प्रमाण कमी होते, वजन नियंत्रणात येते असे सांगितले जाते. या आंब्याच्या जातीचे एक नाव टोमी एटकिन असे असून यातही दोन वेगळ्या जाती आहेत. अर्थात या आंब्याच्या सेवनाचे जे फायदे सांगितले जात आहेत त्याची पुष्टी केली गेलेली नाही.

जगातील सर्वात प्रसिद्ध इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप काही दिवसांपासून नवनवीन फीचर घेऊन येत आहे. दरम्यान, थर्ड पार्टी ॲप्सच्या वापरामुळे फॅन्सी फॉण्ट्सच्या मदतीने चॅटिंगची मजा आणखी वाढणार आहे.

व्हॉट्सॲपवर चॅटिंगची मजा आणखी वाढणार, फॅन्सी फॉण्ट्स वापरून कसं कराल चॅटिंग?

व्हॉट्सॲपचा वापर आजकाल इतका वाढला आहे की जर एखाद्याला एखादी गोष्ट सांगायची असेल किंवा एखादं महत्त्वाचं डॉक्यूमेंटही पाठवायचं असेल तर आपण मी व्हॉट्सॲप करतो असंच म्हणत असतो. त्यामुळे आजकाल मेसेज पाठवण्यापासून ते कॉलिंग आणि व्हिडीओ कॉलिंग तसंच महत्त्वाची कागदपत्रं पाठवण्यासारखी सर्वच कामं व्हॉट्सॲपवर होत असतात.

आता व्हॉट्सॲपची हीच चॅटिंग आणखी भारी आणि रंगतदार होणार आहे. तर आज आम्ही तुम्हाला एक अद्भुत ट्रिक सांगत आहोत ज्यामुळे चॅटिंगची मजा द्विगुणित होईल. व्हॉट्सॲपचा फॉंट बदलता येणार आहे. पण अजून तरी व्हॉट्सॲपने असे कोणतेही फीचर दिलेले नाही, त्यामुळे या कामात थर्ड पार्टी ॲप्स तुम्हाला मदत करतील. या ॲपचे नाव आहे स्टायलिश टेक्स्ट-फॉण्ट कीबोर्ड. तुम्ही हे ॲप कसे वापरू शकता ते आम्ही तुम्हाला सांगतो...

व्हॉट्सॲपवर चॅटिंगचा फॉंट कसा बदलाला?

▮ सर्वप्रथम तुम्हाला प्ले स्टोअरवर जावे लागेल. त्यानंतर Stylish Text – Fonts Keyboard टाइप करा आणि हे ॲप इन्स्टॉल करा.

▮ डाऊनलोड केल्यानंतर, ॲप उघडा आणि स्क्रीनच्या खालील उजव्या कोपऱ्यात दिलेल्या बाणावर टॅप करा.

▮ त्यानंतर Agree बटण दिसल्यावर त्यावर टॅप करा.

▮ नंतर तळाशी उजव्या कोपऱ्यात कीबोर्ड विभागात जा.



अनोळखी कॉल होतील म्यूट

व्हॉट्सॲपमध्ये आणखी एक नवीन फीचर्स येणार असून समोर आलेल्या माहितीनुसार व्हॉट्सॲपमध्ये अनोळखी नंबरवरून आलेला फोन व्हॉट्सॲपवर आपोआप सायलेंट होणार आहे. हे फीचर कंपनी घेऊन येणार आहे. व्हॉट्सॲपच्या नव्या फीचर्सबद्दल माहिती देणाऱ्या WABetainfo च्या रिपोर्टनुसार ॲण्ड्रॉईड 2.23.10.7 अपडेटसोबत या फीचरला कंपनी आणणार आहे. याच्या मदतीने अनोळखी नंबरवरून येणारा फोन सायलेंट करू शकतो. अनोळखी नंबरला सायलेंट करण्यासाठीची सेटिंग व्हॉट्सॲपच्या सेटिंगमध्ये प्रायव्हसी ऑप्शनमध्ये असेल. ती सेटिंग ऑन करताच हे फीचर वापरता येईल. फोन सायलेंट झाल्यावर नंतर कळण्यासाठी हा नंबर नोटिफिकेशन आणि कॉल लॉगमध्ये नक्कीच दिसेल.

औषधी दुधी भोपळा

दुधी भोपळा म्हटले म्हणजे अनेक जण नाके मुरडतात. मात्र तो किती गुणकारी आहे, याबद्दल तुम्हाला कदाचित माहीत नसावे. दुधी भोपळा औषधी भाजी असून त्यात लोह, कॅल्शियम, फॉस्फरस व अन्य खनिजे आहेत. तंतुमय, रेषादार तसेच जीवनसत्त्व 'क' असलेली ही फळभाजी दुर्लक्षित आहे. मात्र, आता हळूहळू त्याचे महत्त्व नागरिकांना पटत असल्याने ते खाण्याचे प्रमाण वाढले आहे.



▮ हृदयविकाराच्या रुग्णांना दुधी भोपळ्याचा रस सकाळ-संध्याकाळ एक-एक वाटी दिल्यास रोहिण्यांमधील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

▮ दुधी भोपळ्याचा रस एक वाटी, लिंबाचा रस एक चमचा व एक चमचा मध एकत्र करून प्यायल्यास मूत्रविकार कमी होतात.

▮ रोज सकाळी काही न खाण्याआधी अर्धा वाटी दुधी भोपळ्याचा रस व एक चमचा आल्याचा रस पाण्यात मिसळून घेतल्यास स्थूलपणा कमी होतो.

▮ भोपळ्याच्या एक वाटी रसात एक चमचा मध व चिमूटभर जायफळ पूड मिसळून तयार झालेला लेप त्वचेवर लावल्याचा कांती उजळते.

▮ एक चमचा आवळा चुर्ण भोपळ्याच्या रसात मिसळून रात्री कोमट पाण्यासह घेतल्याने झोप चांगली लागते. तसेच पोट साफ होते.

▮ दुधी भोपळ्याचा एक वाटी रस एक चमचा ओवा, चिमूटभर काळे मीठ घालून गरम करून ते चाखल्याने पोटाचा फुगीरपणा कमी होतो.

▮ दुधी भोपळ्याचा रस आटवून त्यात एक मिरे व पिंगळी वाटून त्यात एक चमचा मध मिसळून त्याचे चाटण लहान मुलांना दिल्यास छातीतील कफ दूर होतो.

फॅन्सी आणि क्लासी फ्रिलचे ड्रेस !

लहानपणी तुम्ही फ्रिलचे फ्रॉक आणि स्कर्ट घालून ठुमकत ठुमकत चालत होता. तसेच फ्रिलदार फ्रॉक, स्कर्ट आणि शर्ट सध्या चलनामध्ये आले आहेत. फ्रिलचे फ्रॉक तर मुली कॉर्पोरेट सूटसोबत घालणे पसंत करतात. कारण बोअरिंग दिसणारे फॉर्मल सूट फ्रिलच्या फ्रॉकमुळे नवीन लूकमध्ये दिसतात.

फ्रिलच्या ड्रेसचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे फेमिनीन लूक देतात आणि तुम्ही याला पार्टी वेअर ते कॅज्युअल वेअरपर्यंत घालू शकता. या प्रकारचे रफल्ड ड्रेस तुम्ही बऱ्याच डिझाईनमध्ये तयार करू शकता. जसे रफल्ड रँप ड्रेस, सिंगल लेअर रफल्ड ड्रेस, टीर्ड रफल्ड ड्रेस. रफल्ड ड्रेस स्टायलिश लूक तर देतातच, त्याशिवाय तुमच्या बऱ्याच समस्यांचे निदान देखील करतात. जसे तुमची बस्ट लाइन स्मॉल असेल तर अशा ड्रेसची निवड करा ज्यात फ्रिल वरच्या बाजूस दिली असेल. आणि जर बस्ट लाइन हेवी असेल तर तुमच्यासाठी अशा प्रकारचे ड्रेस योग्य राहतील, ज्यात फ्रिल व्हर्टिकली स्ट्रेट लाइनमध्ये असेल. जर तुम्ही बॉडीच्या खालील भागाला हेवी लूक देण्याचा प्रयत्न करत असाल तर खालच्या बाजूला फ्रिल असलेले फ्रॉक परिधान करणे उपयुक्त ठरेल.



सध्या बॉलीवूडच्या अभिनेत्री देखील फ्रिलने सजलेले फ्रॉक परिधान करतात. मागील काही समारंभात दीपिका पदुकोण, अनुष्का शर्मा, प्रियंका चोप्रा, सोनाक्षी सिन्हा व प्रीती झिंटा फ्रिलच्या ड्रेसमध्ये आल्या होत्या.

फ्रिलच्या ड्रेसमध्ये तुम्हाला ज्वेलरीची चिंता करण्याची गरज नसते. हे फ्रॉक बिन हेवी ज्वेलरीचे पण चांगले लूक देतात. फ्रिलदार ड्रेसला तुम्ही बऱ्याच डिझाईन व मटेरियलमध्ये तयार करू शकता. हे हलके कपडे जसे जा-र्जेट, शिफॉन, कॉटन आणि सॅटिनमध्ये जास्त चांगले लूक देतात. तर मग आता पुढच्या पार्टीत वेगळे दिसण्यासाठी एखादा फ्रिलचा ड्रेस स्वतःसाठी नक्कीच तयार करा.



दररोज व्यायाम करणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे. व्यायाम केवळ फिट ठेवत नाही तर अनेक आजारांपासूनही संरक्षण करतो. पण व्यायाम करण्यासाठी अधिक ऊर्जेची गरज भासते. त्यामुळे आहारात योग्य त्या पदार्थांचा समावेश करणं आवश्यक आहे.

दररोज व्यायाम करणाऱ्यांनी आहारात 'या' पदार्थांचा समावेश करा

प्रोटीन : शरीराच्या वजनानुसार, दररोज ०.९ ग्रॅम प्रोटीन आपल्या आहारातून घेणं गरजेचं आहे. जर तुम्ही वजन नियंत्रणात राखू इच्छिता तर कॅलरीचं प्रमाण तपासणं महत्त्वाचं आहे.

फळे : जितकं शक्य आहे तितकं आहारात फळांचा समावेश करा. फळांमध्ये पुरेशा प्रमाणात फायबर असतं. व्यायाम करण्याच्या जवळपास दोन तासांपूर्वी आणि त्यानंतरही केळे खाणे शरीरासाठी फायदेशीर आहे. संत्री, द्राक्षही फायदेशीर ठरतात.

कार्बोहायड्रेट : कार्बोहायड्रेट प्रोटीनच्या तुलनेत शरीराला लवकर ऊर्जा प्रदान करतात. याची व्यायामावेळी अधिक आवश्यकता असते. कार्बोहायड्रेट मांसपेशींमध्ये ग्लायकोजनची गरज भरून काढण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे आहारात फरसबी, ब्राऊन राइस यासारख्या पदार्थांचं सेवन करणं महत्त्वाचं ठरतं. व्यायाम करण्याआधी ५० ग्रॅम कार्बोहायड्रेट घेण्याचा सल्ला दिला जातो.

बदाम दूध किंवा ओट्स दूध : व्यायाम करण्याआधी बदाम दूध किंवा ओट्स दूध पिणं आवश्यक ठरतं. हे शरीराला पुरेशी ऊर्जा पुरवण्याचं काम करतात. यामुळे व्यायाम करतानाही ऊर्जा मिळते. तसंच शरीराला पुरेसं पोषणही मिळण्यास मदत होते.



उपयोगी पडणाऱ्या ब्युटी टिप्स

▮ स्टीम बाथ घेण्यापूर्वी शक्य तितके जास्त पाणी प्यावे म्हणजे डिहायड्रेशनचा त्रास होणार नाही.

▮ नाक, तोंडावर कपडा बांधून स्वयंपाकघराची स्वच्छता केल्याने धुळीचे कण शरीरापर्यंत पोहोचत नाहीत.

▮ कैरीच्या कच्च्या पांढऱ्या बिया, मेंदी, कडूलिंबाची पावडर यांचे मिश्रण केसांकरिता उपयोगी असते.

▮ नेल ब्लिच तयार करताना सायट्रिक ॲसिड किंवा हायड्रोजन पेरॉक्साईडचा वापर साधारणपणे केला जातो.

▮ रात्री झोपताना लिंबाचा रस, गुलाब पाणी व ग्लिसरिन लावा. हात-पाय मऊ व चकचकीत होतात.

▮ स्विमिंग करताना स्विमिंग कॅप वापरावी. कारण पूलच्या पाण्यात क्लोरिन जास्त असल्यामुळे केस खराब होतात.

▮ केसांमध्ये हेअर ड्रायरचा वापर कमीत कमी करावा. कारण, केस गळण्यास सुरुवात होते तसेच ते द्विभाजितही होतात.

▮ नॅचरल मेकअपसाठी फाऊंडेशन लावल्यानंतर दोन मिनिटानंतर पावडर लावायला पाहिजे. त्याने फाऊंडेशनमुळे पडणारे चकते दिसणार नाही.

▮ जरदोसी मेंदी सिल्व्हर किंवा गोल्डन शेडमध्ये असते. मेंदीने हातांवर सिल्व्हर किंवा गोल्डन रंगाने डिझाइन बनवण्यात येते.

▮ चौपाटी किंवा एखाद्या डोंगरावर ट्रेकिंगला जाण्याचा प्लान करत असल तर आपल्या त्वचेची काळजी घ्यायला विसरू नका.

▮ गुडघ्यापर्यंत मिडी किंवा मिनी स्कर्टसोबतसुद्धा लॅगिंग्सचा वापर करता येतो. लाँग स्कर्टसोबत स्लॅक्स वापरू शकता.

डायबेटिसच्या रुग्णांनी खाण्या-पिण्याबाबत विशेष पथ्य पाळणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. शुगर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठीच या टिप्स..

शुगरवर कंट्रोल ठेवण्यासाठी हे टाळा...

▮ साखरयुक्त पदार्थ, मध, सरबत, सिरप, कोल्ड ड्रिंक्स, गूळ, तूप, केक, पेस्ट्री, आईस्क्रीम, दारू, बीयर आदींचे डायबेटिसच्या रुग्णांनी सेवन करू नये. ▮ ज्या भाज्या जमिनीत येतात, उदा. बटाटे, रताळे, इत्यादी भाज्या खाणे टाळावे. ▮ केळी, चिकू, आंबा, सीताफळ, द्राक्ष, पपई, पेरू, ऊस आदी फळे वर्ज्य करावीत. ▮ काजू, मनुका, बदाम, भुईमुगाच्या शेंगा, अक्रोड आदी सुकामेवा टाळावा. ▮ मांसाहार टाळावा. ▮ भात, वरण, दूध, पनीर, दही, मासे आदी पदार्थ कमी प्रमाणात खावेत. ▮ कच्च्या भाज्या उदा. मेथी, पालक, दुधी भोपळा, मुळा, कोथिंबीर, गोबी, चवळी, टोमॅटो, कांदा, कारले, कांद्याची पात, कैरी, लिंबू पाणी आदी पदार्थ भरपूर प्रमाणात खावे



दररोज व्यायाम करणाऱ्यांनी आहारात 'या' पदार्थांचा समावेश करा

बहुपयोगी स्ट्रॉबेरी

स्ट्रॉबेरी फारच आकर्षक दिसते, त्यामुळे पाहताक्षणीच खावीशी वाटते. आंबट-गोड चवीचं हे फळ थंडीच्या दिवसात मिळतं. स्ट्रॉबेरीचा आकार लहान असला तरी आरोग्याच्या दृष्टीने ती फारच गुणकारी आहे. स्ट्रॉबेरी हे मेंदूचं खाद्य असल्याचं एका संशोधनातूनही समोर आले आहे. भरपूर ॲंटीऑक्सिडंट्स असल्याने स्ट्रॉबेरीच्या सेवनाने मेंदूची क्षमता वाढते. इतर अनेक रोगांवरही हे फळ उपयुक्त ठरतं. चला जाणून घेऊ स्ट्रॉबेरीचं आपल्या आहारातील महत्त्व...

▮ दिवसाला तीन ते चार स्ट्रॉबेरी खाल्ल्याने स्मरणशक्ती तसेच एकाग्रता वाढायला मदत होते.

▮ स्ट्रॉबेरी हे पोटॅशियम आणि 'क' जीवनसत्त्वाने समृद्ध फळ आहे. हे दोन्ही घटक तुम्हाला उत्साही ठेवण्यास मदत करतात.



▮ वाढत्या वयात त्वचेवर सुरकुत्या पडतात. पण स्ट्रॉबेरीमुळे या सुरकुत्यांचं प्रमाण कमी होतं.

▮ स्ट्रॉबेरी खाल्ल्याने तुमची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

▮ हार्मोन्सचं संतुलन तसंच हाडांच्या आरोग्यासाठी स्ट्रॉबेरीचा आहारात समावेश करायला हवा.

▮ शरीरावर आलेली सूज स्ट्रॉबेरीच्या सेवनाने कमी होते.

▮ कॅन्सरपासून बचाव करण्याची क्षमता स्ट्रॉबेरीत आहे.

▮ केस आणि त्वचा या दोन्हीचं आरोग्य राखण्यातही स्ट्रॉबेरी महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणूनच अनेक सौंदर्यप्रसाधनांमध्ये स्ट्रॉबेरीच्या तत्त्वांचा वापर केला जातो.

▮ स्ट्रॉबेरीतील काही गुणधर्मांमुळे सूर्याच्या अतिनील किरणांपासून केस आणि त्वचा यांचं रक्षण होऊ शकतं.

बालविवाहाच्या कुप्रथेला आळा घालण्यासाठी सरकारची मोठी पावले

लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापणे होणार अनिवार्य

हा नियम संपूर्ण राज्यभरात लागू करण्यासाठी शासन अंतिम मसुदा तयार करत असून लवकरच याची अधिकृत घोषणा केली जाईल. बालविवाह हा केवळ कायद्याचा विषय नसून ती एक खोलवर रुजलेली अनिष्ट सामाजिक प्रथा आहे. त्यामुळे या कडक नियमांसोबतच गावपातळीवर मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवणे आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.



■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

राज्यातील बालविवाहाची प्रथा पूर्णपणे बंद करण्यासाठी आणि अल्पवयीन मुलींचे लग्न लावून देणाऱ्या प्रवृत्तींना रोखण्यासाठी महाराष्ट्र शासन एक अत्यंत कठोर निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. यापुढे लग्नाच्या निमंत्रण पत्रिकेवर वधू आणि वर या दोघांच्याही नावापुढे त्यांची अधिकृत जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव सरकारकडून अंतिम टप्प्यात आहे. राजस्थान सरकारने यापूर्वीच असा नियम लागू केला असून, तिथे मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर आता महाराष्ट्रही याच धर्तीवर कडक नियमावली लागू करणार आहे.

ग्रामीण भागातील परिस्थिती आणि आकडेवारीचा आधार

विधिमंडळात सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागात अजूनही छुप्या मागार्ने मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत आहेत. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, ती पाहूनच सरकारने या प्रस्तावावर वेगाने काम सुरू केले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच मुलींचे विवाह लावून देण्याचे प्रमाण धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. नवीन नियमावलीनुसार, लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापल्यामुळे वधू आणि वर यांचे वय कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे की नाही, हे सर्वांना समजेल. यामुळे बालविवाहाचा संशय आल्यास, पत्रिकेवरील जन्मतारखेचा पुरावा वापरून पोलिसांत किंवा बालहक्क आयोगाकडे तक्रार करणे सोपे होईल. नियमांचे उल्लंघन करून बालविवाह लावणारे कुटुंबीय आणि ही पत्रिका छापून देणारे मुद्रक यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे प्रशासनाला अधिक सुलभ होईल.

काही जिल्ह्यांमधील भयावह वास्तव

सरकारी आकडेवारीनुसार, परभणी जिल्ह्यात ४८ टक्के, बीडमध्ये ४३.७ टक्के, धुळ्यात ४०.५ टक्के आणि सोलापूर जिल्ह्यात ४०.३ टक्के मुलींचे १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच लग्न झाले आहे. ही आकडेवारी अत्यंत धक्कादायक असून, राज्यातील इतर अनेक जिल्ह्यांमध्येही बालविवाहाची स्थिती प्रशासनासाठी चिंतेची बाब ठरली आहे. बालविवाहामुळे केवळ कायद्याचा भंग होतो असे नाही, तर यामुळे अल्पवयीन मुलींचे शिक्षण अर्धवट सुटते. तसेच, कमी वयात मातृत्व लादले गेल्याने त्यांच्या आरोग्यावर आणि मानसिक स्थितीवर अत्यंत घातक परिणाम होतात, असे महिला व बालविकास विभागाने नमूद केले आहे.

राजस्थानच्या धर्तीवर निर्णय

देशात राजस्थान सरकारने आपल्या राज्यात बालविवाह रोखण्यासाठी लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापण्याचा नियम लागू केला होता, ज्याचे सकारात्मक परिणाम पाहायला मिळाले. याच धर्तीवर आता महाराष्ट्र सरकार देखील या प्रस्तावाचा गंभीरतेने अभ्यास करत असून, लवकरच यावर अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

नियम लागू करण्याचे मुख्य कारण :

१) वय तपासणे सोपे होणार: अनेकदा बालविवाहाची माहिती लग्न पूर्ण झाल्यावर किंवा अगदी ऐनवेळी प्रशासनाला मिळते, ज्यामुळे कारवाई करणे कठीण होते. पत्रिकेवर जन्मतारीख असल्यास स्थानिक प्रशासनाला सुरुवातीलाच वयाची पडताळणी करणे सोपे होईल.

२) चिंताजनक आकडेवारी: विधानसभेत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये १८ वर्षांखालील मुलींचे विवाह होण्याचे प्रमाण अजूनही खूप जास्त आहे. यामध्ये परभणी (४८%), बीड (४३.७%), धुळे (४०.५%) आणि सोलापूर (४०.३%) या जिल्ह्यांचा समावेश आहे.

उल्लंघन केल्यास कडक कारवाई :

हा नियम केवळ लग्न करणाऱ्या कुटुंबापुरता मर्यादित नसून, नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाईची तरतूद केली जात आहे. लग्नपत्रिका छापणारे प्रिंटिंग प्रेस, लग्न लावणारे पुरोहित (भटजी), बँडवाले आणि लग्न हॉल (मंगळ कार्यालय) मालक यांनाही या कायद्याच्या कक्षेत आणले जाईल, जेणेकरून कोणीही बालविवाह करण्याचे धाडस करणार नाही.

या निर्णयामुळे मुलींचे आरोग्य, शिक्षण यांचे रक्षण होऊन बालविवाहासारख्या सामाजिक प्रथेला पूर्णपणे चाप बसेल, असा विश्वास सरकारकडून व्यक्त केला जात आहे.

'ओसी' नसलेल्या इमारतींना दिलासा

८०० चौरस फुटांपर्यंत सदनिका असलेल्या इमारतींना मिळणार ओसी

राज्य सरकारची मंजुरी



■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईत आजही अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) मिळालेले नाही. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या दालनात सोमवारी झालेल्या बैठकीत ८०० चौरस फुटांपर्यंत सदनिका असलेल्या इमारतींना ओसी देण्यास मंजुरी दिल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे अशा इमारतींना आता दिलासा मिळणार आहे.

मुंबईतील अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र नसल्याचे उघड झाले आहे. १७ नोव्हेंबर २०१६ पूर्वीपासूनच्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. इमारतींचे बांधकाम नियमानुसार न करता वाढीव काम केले किंवा काही बदल केल्याचे निदर्शनास आले तर मुंबई महापालिका अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देत नाही. यासाठी राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडे अभय योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सुधारित नियमावलीचा प्रस्ताव सादर केला आहे. हा प्रस्ताव मंजूर होईपर्यंत ८०० चौरस फुटापर्यंतच्या सदनिका असलेल्या इमारतींना दिलासा देण्याचा निर्णय घेतला असून स्थायी समितीत तो मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे.

मुंबईतील सुमारे २५ हजार इमारतींना नियमित करण्यासाठी 'सुधारित भोगवटा अभय योजना' लागू करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपूर विधानसभेत केली होती. भोगवटा प्रमाणपत्राअभावी या इमारतींमधील रहिवाशांना दुप्पट मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि मलनिःसारण कर भरावा लागतो. मात्र, सरकारने घोषित केलेल्या योजनेमुळे अनेकांना त्याचा थेट फायदा होणार असल्याचे स्पष्ट केले होते. अनेक गृहनिर्माण संस्था या योजनेसाठी सरकारकडे पाठपुरावा करत होत्या. राज्याच्या नगरविकास खात्याकडून प्राप्त झालेल्या निदेर्शानुसार, १७ नोव्हेंबर २०१६ पूर्वीपासून वास्तव्य होत असलेल्या तसेच बांधकाम परवानगी दिलेल्या इमारतींकरता सुधारित मुदत विचारात घेण्यात यावी, अशी सूचना केली होती. त्यानुसार मुंबई महापालिकेने या अभय योजनेसाठी मार्गदर्शक तत्वे बनवली.

या मार्गदर्शक धोरणामध्ये निवासी इमारती, रुग्णालये आणि शाळेच्या इमारती यांना या ओसी प्रमाणपत्रासाठी अभय योजनेत भाग घेता येऊ शकतो. जी इमारत किंवा इमारतीचा भाग १७ नोव्हेंबर २०१६ पूर्वीपासून वापरात आहे आणि ज्या सदनिका ८०० चौरस फुटापर्यंतच्या आहे अशा इमारतींना याचा लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या अभय योजनेतंर्गत पुनर्विधीग्राह्यता शुल्क, बाल्कनी बंदिस्त करण्याचे, ओटला बंदिस्त करण्याचे, माळा शुल्क दंड, अर्ज फी इत्यादींच्या रकमेवरील शुल्कात या अभय योजनेतंर्गत प्रचलित धोरणांनुसार नियमित शुल्कांवर ५० टक्के सूट दिली जाणार होती. प्रस्ताव पहिल्या सहा महिन्यांमध्ये सादर झाल्यास कोणताही दंड आकारला जाणार नाही. पण त्यानंतर आल्यास दंडाच्या रकमेत ५० टक्के सवलत दिली जाताना त्यानंतर आल्यास कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नसल्याचेही नमूद आहे. एप्रिल २०२६ मध्ये हा प्रस्ताव स्थायी समितीत आल्यानंतर विकासकाच्या फायद्यासाठीच प्रस्ताव असल्याची टीका विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर केली होती. त्यामुळे हा प्रस्ताव स्थायी समितीने राखून ठेवला आणि तो सुधारित करण्यात येईल. असे स्पष्ट केले. त्यानंतर दोन महिने उलटूनही हा प्रस्ताव सादर झालेला नाही. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव पुन्हा एकदा मंजुरीसाठी सादर केला जाणार असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

लग्नसोहळ्याची तयारी सुरू असताना अश्लील फोटो अन्...

नवरी मुलीसह आई वडिलांनी उचललं टोकाचं पाऊल

घरात लग्नसोहळ्याची तयारी सुरू असताना नवरी मुलीसह आई-वडिलांनी जीवन संपवलं.
कुटुंब हे मुलीच्या लग्नाची तयारी करत असताना, ही दुदैवी घटना घडली आहे. या घटनेनं संपूर्ण कुटुंब हादरून गेले आहे. एका झटक्यात तिघांचा जीव गेला, जीवन संपवण्यामागचं धक्कादायक कारण समोर आलं आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

घरात लग्नसोहळ्याची तयारी सुरू असताना नवरी मुलीसह आई-वडिलांनी जीवन संपवलं. कुटुंब हे मुलीच्या लग्नाची तयारी करत असताना, ही दुदैवी घटना घडली आहे. या घटनेनं संपूर्ण कुटुंब हादरून गेले आहे. एका झटक्यात तिघांचा जीव गेला, जीवन संपवण्यामागचं धक्कादायक कारण समोर आलं आहे. एका तरुणाने मुलीचे काही खासगी फोटो तिच्या होणाऱ्या नवऱ्याला पाठवल्याची माहिती समोर आली. हा धक्कादायक प्रकार कर्नाटकातील म्हैसूर जिल्ह्यात घडला होता.

लेकीसह आई वडिलांनी उचललं टोकाचं पाऊल

फोटो लीक झाल्यानंतर मुलीचे लग्न कार्य सुरू असलेल्या घरात मोठा वाद झाला होता. तिच्या होणाऱ्या नवऱ्यासोबत वाद झाला होता. या संपूर्ण घटनेनं मुलगी आणि तिचे आई-वडील व्यथित झाले. सोमवारी, लग्नाच्या काही दिवसांपूर्वी 21 वर्षीय तरुणीने आणि तिच्या आई-वडिलांनी टोकाचं पाऊल उचललं.

आजच्याच दिवशी विवाह होणार होता

पोलिसांच्या माहितीनुसार, उल्लास गौडा नावाच्या एका तरुणाचे तरुणीवर प्रेम होते, त्याने तिला लग्नाची मागणी केली होती. उल्लास गौडाने पीडित तरुणीचा छळ केला. तसेच आई-वडिलांवर लग्नासाठी अनेकदा दबाव आणू लागला होता, परंतु मुलीने आणि तिच्या कुटुंबीयांनी त्याचा प्रस्ताव स्पष्टपणे नाकारला. उल्लास गौडा अत्यंत अस्वस्थ झाला होता. मुलीचा साखरपुडा झाला असता, आज 24 जून रोजी तिचा विवाह होणार होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 21 जूनच्या रात्री मुलीच्या पालकांनी उल्लास गौडा आणि आई-वडिलांना बोलावून त्यांचे समुपदेशन केले. त्याला पीडितेचे काही खासगी फोटो हटवण्यास सांगितले. गौडाने काही फोटो स्वतःकडे ठेवले होते. घरी परतल्यानंतर लगेचच त्याने ते फोटो मुलीच्या होणाऱ्या नवऱ्याला पाठवले, असा आरोप करण्यात आला. यामुळे नवरदेव आणि त्याचे कुटुंबीय संतापले. ते तात्काळपणे घरी गेले आणि प्रकरण अधिकच चिघळू लागलं. नाते तुटल्यानंतर वधू आणि कुटुंबीय तणावाखाली आले.



महिलेचे पार्टीतील फोटो वापरून अश्लील व्हिडिओ बनवला

नंतर तोच व्हॉट्सॲपवर केला व्हायरल

एका महिलेसोबत धक्कादायक प्रकार घडला आहे. महिलेच्या फोटोचा वापर करून अश्लील व्हिडिओ बनवण्यात आले आहेत. नंतर तोच व्हिडिओ व्हॅट्सॲपवरील ग्रुपवर शेअर करत व्हायरल केला. दरम्यान, महिलेच्या आरोपांवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

दिल्लीतील एका महिलेसोबत धक्कादायक प्रकार घडला आहे. महिलेच्या फोटोचा वापर करून अश्लील व्हिडिओ बनवण्यात आले आहेत. नंतर तोच व्हिडिओ व्हॅट्सॲपवरील ग्रुपवर शेअर करत व्हायरल केला. दरम्यान, महिलेच्या आरोपांनुसार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका पार्टीदरम्यान हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता, या घटनेनं पीडिता आणि कुटुंब मानसिकदृष्ट्या खचलं आहे.

महिला पीडितेचा मॉर्फ अश्लील व्हिडिओ बनवून शेअर केला

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, अश्लील व्हिडिओ बनवण्यात आलेल्या महिलेचं वय वर्षे 39 आहे. संबंधित महिला ही राजोरी गार्डन परिसरातच राहत होती. तक्रारीत तिनं नमूद केलं की, तिच्या व्हॅट्सॲपच्या ग्रुपवर तिचा मॉर्फ अश्लील व्हिडिओ बनवून शेअर करण्यात आला होता, असा पीडितेचा आरोप आहे.

शाळेतील मैत्रिणीकडून अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्याची माहिती

पीडितेच्या आरोपांनुसार, 18 मार्च रोजी शाळेतील मैत्रिणीने अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्याचं सांगितलं. तपासानंतर समजलं की, आरोपींनी 7-8 लोकांचा एक व्हॅट्सग्रुप बनवला होता. पीडितेला जाणुनबुजून मानसिक त्रास दिला जात होता. शरमेच्या भीतीनं पीडिता आणि तिच्या कुटुंबीयांना मानसिक तणावाचा सामना करावा लागला होता.

सायबर पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आलं की, ज्या नंबर वरून हा व्हिडिओ व्हायरल करण्यात आला, तो नंबर सचिन तंवर या नावाचा होता. ओळख लपवण्यासाठी कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी दुसऱ्या नंबरचा वापर करण्यात आला होता. पोलीस व्हॉट्सॲप आणि सोशल मीडियावरून डिजिटल प्लॅटफॉर्मवरून पुरावे गोळा करत आहेत.

नवरा कामावर गेला, अन्... घरात बायको आणि प्रियकर एकत्रच

आई आणि मुलीच्या नात्याला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आईने प्रियकराला हाताशी घेऊन आपल्याच 2 वर्षाच्या चिमुकल्याची हत्या केली. त्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे भासवून त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. मात्र, 20 दिवसांनंतर या पापाचा पदार्फाश झाला आणि पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.



■मुंबई। प्रतिनिधी,

तेलंगणाच्या मेडचल जिल्ह्यातील आई आणि मुलीच्या नात्याला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आईने प्रियकराला हाताशी घेऊन आपल्याच 2 वर्षाच्या चिमुकल्याची हत्या केली. त्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे भासवून त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. मात्र, 20 दिवसांनंतर या पापाचा पदार्फाश झाला आणि पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. ही भीषण घटना तेलंगणाच्या कीसारा पोलीस ठाणे परिसरात घडली. मूळचे सिद्दिपेट जिल्ह्यातील दगदेवपूर मंडळातील तीगुल रहिवासी असलेले स्वामी आणि ज्योती सध्या मेडचल जिल्ह्यातील कीसारा येथे राहत होते. स्वामी टॅक्सी चालक होते आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांना एक मुलगी आणि एक मुलगा होता.

नवरा कामावर गेला आणि घरात बायको प्रियकरासोबत होती अन्..

पोलिसांच्या माहितीनुसार, ज्योतीचे लग्नापूर्वी यादद्री भुवनगिरी जिल्ह्यातील माधापुर गावातील रहिवासी असलेल्या नवीन नावाच्या तरुणासोबत प्रेम प्रकरण होते. लग्नानंतर ज्योतीने नवीनशी नाते तोडले नव्हते. जेव्हा पती स्वामी हा टॅक्सी घेऊन जायचा तेव्हा नवीन ज्योतीच्या घरी यायचा. 29 मे रोजी देखील असाच प्रकार घडला होता. दोघे घरात एकत्र होते त्यावेळी दोन वर्षाचा मुलगा जोराने रडू लागला होता.

दोन वर्षाच्या मुलगा दोघांच्या नातेसंबंधात अडथळा

मुलाच्या रडण्याने ज्योती आणि प्रियकर नवीनच्या एकांतात व्यत्यय आला. मुलगा दोघांच्या नातेसंबंधात अडथळा ठरत होता, म्हणून दोघांनी चिमुरड्या हरिकृष्णाचे पाय पकडले, नंतर त्याला जमिनीवर आपटून जीवे मारलं. नंतर बेदम मारहाण केली. चिमुरड्याच्या डोक्याला गंभीर जखम झाली आणि रक्त येऊ लागलं, इतक्यातच चिमुरड्याने अखेरच्या श्वास घेतला. खूनानंतर आईने रडण्याचे नाटक केले होते. नंतर त्यांनी नोकरीवरून आलेल्या नवऱ्याला हरिकृष्णाच्या मृत्यूबाबत महिती दिली. पती स्वामीने पत्नीच्या सांगण्यावर विश्वास ठेवला होता. नंतर लहान मुलाचा मृतदेह गावात नेत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, प्रकरण उघडकीस आल्यानंतर स्वामीच्या पायाखालची जमीन सरकून गेली. तो तात्काळ पोलीस ठाण्यात गेला आणि पत्नी आणि तिच्या प्रियकराविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. प्रकरणाचं गांभीर्य पाहून स्वामीने लहान मुलाचा मृतदेह बाहेर काढला, नंतर शवविच्छेदनासाठी पाठवला होता. पोलिसांनी तात्काळपणे कारवाई करत ज्योतीला अटक केली. फरार झालेल्या प्रियकराचा तपास सुरू आहे.

20 तास काम, जनावरांचं खाद्य अन् मृत्यू, 'या' 12 कामगारांसोबत मालकाने काय केलं?

एका कारखान्यातून काही अल्पवयीन मुलांसह बारा वेठबिगार मजुरांची सुटका करण्यात आला आहे.
या मजुरांनी आरोप केला आहे की, त्यांना नोकरीची खोटी आश्वासने देऊन फसवण्यात आले, डांबून ठेवण्यात आले, त्यांचा छळ करण्यात आला आणि मोबदला न देता काम करण्यास भाग पाडण्यात आले. कायद्याने बंदी घातलेल्या वेठबिगारीची उत्तर प्रदेशातील ही कहाणी.

■मुंबई। प्रतिनिधी,

एका कारखान्यातून अल्पवयीन मुलांसह 12 मजुरांची पोलिसांनी यशस्वी सुटका केली आहे. या मजुरांना गेल्या अनेक महिन्यांपासून डांबून ठेवून, दिवसातून तब्बल 20-20 तास काम करण्यास भाग पाडले जात होते. इतकेच नव्हे तर त्यांना प्रचंड मारहाण करून गुरांच्या खाद्यापासून (कोंड्यापासून) बनवलेल्या सुक्या भाकरी खायला देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या नरकयातनेतून एका मजुराने कसाबसा स्वतःचा जीव वाचवून पळ काढला आणि पोलिस स्टेशन गाठले. त्याच्या तक्रारीनंतर पोलिस आणि कामगार विभागाने तात्काळ कारखान्यावर छापा टाकून या 12 मजुरांची सुटका केली. सुटकेनंतर पोलिसांनी सर्वप्रथम भावूक झालेल्या या मजुरांना पोलिस ठाण्यात जेवण दिले. या प्रकरणी कारखान्याचा सुपरवायझर शिवा त्यागी याला अटक करण्यात आली असून, मुख्य मालक अंकित बालियान सध्या फरार आहे. उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगरमधील ही घटना आहे. वेठबिगारीच्या या प्रकरणामुळे सर्वत्र खळबळ माजली आहे. भारतात 1976 मध्ये कायदा करुन वेठबिगारीवर बंदी घालण्यात आली आहे.

मजुराचा छळ करून खून

या प्रकरणात आणखी एक थरकाप उडवणारा खुलासा मजुरांनी केला आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर (2025) मध्ये अर्जुन ऊर्फ 'टोपी' नावाच्या एका नेपाळी मजुराचा कारखान्यात अमानुष छळ करून खून करण्यात आला होता, असा आरोप मजुरांनी केला आहे. त्याचा मृत्यू झाल्यावर त्याचा मृतदेह एका गोणीत भरून गायब करण्यात आला. या धक्कादायक खुलाशानंतर पोलिसांनी आता या प्रकरणात हत्येचा नवा गुन्हा दाखल



केला असून तपास सुरू केला आहे. मजुरांनी सांगितले की, कारखान्यात भीतीचे वातावरण तयार करण्यासाठी मालक भिंतीवर पिस्तुलमधून गोळ्या झाडायचा आणि 'कोणाला काही सांगितले तर तुमचीही हिच अवस्था करू' अशी धमकी द्यायचा.

नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

सुटका करण्यात आलेल्या मजुरांनी सांगितले की, त्यांना रेल्वे स्थानके आणि बसस्थानकांवरून गाठण्यात आले होते. दरमहा 12,000 ते 15,000 रुपये पगार, राहण्याची-खाण्याची सोय आणि फक्त 8 तास काम करण्याचे आमिष दाखवून त्यांना येथे आणले गेले. मात्र, कारखान्यात पाऊल ठेवताच दुसऱ्याच दिवसापासून त्यांचे मोबाईल आणि ओळखपत्रे काढून घेण्यात आली. त्यांना मुख्य दरवाजाला कुलूप लावून आतमध्ये कैद करण्यात आले. एका मजुराने सांगितले की, त्यांचे काम पहाटे 4 वाजल्यापासून सुरू व्हायचे ते थेट मध्यरात्रीपर्यंत चालायचे. दिवसातून जेमतेम 2 ते 3 तास झोप मिळायची. कोणी आजारी पडले तरी सुट्टी दिली जात नव्हती.

पिटबुल कुत्रे आणि सीसीटीव्हीचा पहारा

हा कारखाना म्हणजे एक प्रकारे अभेद्य तुरुंग बनवण्यात आला होता. मजुरांनी सांगितले की, कारखान्याला अत्यंत उंच भिंती होत्या, जागोजागी कुलूपबंद दरवाजे आणि आत-बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले होते. तसेच मजूर पळून जाऊ नयेत म्हणून तिथे हिंस्त्र 'पिटबुल' प्रजातीचे कुत्रे सोडण्यात आले होते. एका मजुराने सांगितले, "कुत्र्यांना दूध आणि मांस खायला दिले जायचे, पण आम्हाला मात्र सुक्या भाकऱ्या दिल्या जात होत्या." मजुरांच्या पाठीवर, कमरेवर आणि पायावर मारहाणीचे गंभीर व्रण आहेत. त्यांना बेल्ट, लाठ्या आणि भाल्यासारख्या टोकदार शस्त्रांनी टोचून जखमी करण्यात आले होते, तसेच कुत्र्यांकडूनही चावा घ्यायला लावला होता.

पुनर्वसन आणि पुढील कारवाई

सहाय्यक कामगार आयुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व 12 मजुरांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मजुरांना झालेल्या प्रचंड मानसिक धक्क्यातून बाहेर काढण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांकडून समुपदेशन केले जात आहे. सुटका झालेल्यांपैकी 4 मजुरांना त्यांच्या कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले असून इतरांच्या नातेवाईकांचा शोध सुरू आहे. कामगार विभागामार्फत 'बंधक मजूर पुनर्वसन योजने'अंतर्गत सर्व मजुरांना तातडीची आर्थिक मदत दिली जात आहे. तसेच ज्या मजुरांचे बँक खाते नाही, त्यांचे खाते उघडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. फरार कारखाना मालकाला पकडण्यासाठी पोलिसांचे पथक कसून शोध घेत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com